

# श्री साईलीला

डिसेंबर

किंमत
एक
रुपया

१९७१

# श्रीसाईलीला-डिसेंबर १९७१

मराठी व हिंदी विभाग :


१ संपादकीय

२ विचारमौक्तिक

३ कविता—

(१) आर्त भक्ताची नित्य प्रार्थना (२) चिंतन
(३) विटेवरी उभा (४) पारा सत्कर्माचा
(५) विचार येता मृत्यूचा (६) श्रीहरीची खूण
(७) अनंताचे प्रमाण

४ मराठीचे महाकवी—उत्तरार्ध

५ हिमालयाची यात्रा

६ शिर्डीवृत्त—(सप्टेंबर व आक्टोबर १९७१)

७ श्रद्धांजली

८ जीवन जगण्याची कला

९ श्रीसद्गुरु साईबाबाके वचन

१० आरती साईबाबा (हिंदी अनुवाद)

११ श्रीसाईबाबा चरित्र (हिंदी)


इंग्रजी विभाग :


1 Editorial

2 Thoughts to ponder over

3 Sai Path and Sai Samaj

4 Shri Sainath Swadhyaya Mandal, Ahmedabad

5 Spiritual culture



# श्री सा ई वा क्सु धा

नाम प्रयत्नें घेतां चोखट । अप्रयत्नेंही नाहीं ओखट ।
मुखासी आलें जरी अवचट । प्रभाव प्रकट करील ॥८७॥
नामापरीस सोपें आन । अंतःशुद्धीस नाहीं साधन ।
नाम जिव्हेचें भूषण । नाम पोषण परमार्था ॥८८॥
नाम घ्यावया नलगे स्नान । नामासी नाहीं विधिविधान ।
नामें सकळपाप निर्दळण । नाम पावन सर्वदा ॥८९॥
अखंड माझेंही नाम घेतां । बेडा पार होईल तत्त्वतां ।
नलगे कांहीं इतर साधनता । मोक्ष हाता चढेल ॥९०॥
जया माझे नामाची घोकणी । झालीच तयाचे पापाची धुणी ।
तो मज गुणियाहूनि गुणी । जया गुणगुणी मन्नामीं ॥९१॥

—साईसच्चरित, अध्याय २७.


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक. ]

वर्ष ५० वे ] डिसेंबर १९७१ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

वार्षिक वर्गणी रु. १० ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

# संपादकीय

## दारूबंदीच्या बाबतीतील खेळखंडोबा :

महात्माजी, कविवर्य रवींद्रनाथ टागोर व दीनबंधू सी. एफ्. अँड्र्यूज यांच्यांशी त्यांच्या हयातीत घनिष्ठ संबंध असलेले श्री. होरेस अँलेक्झांडर हे नुकतेच भारतात येऊन दीनबंधू अँड्र्यूज यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एक व्याख्यान-माला गुंफून गेले. श्री. अँलेक्झांडर आता ८२ वर्षांचे आहेत. त्यांनी महात्माजींची एक आठवण सांगितली. महात्माजी व ते यांच्या एका भेटीत सक्तीच्या दारूबंदीबद्दल चर्चा झाली. त्यावेळी महात्माजी खालीलप्रमाणे बोलल्याचे त्यांनी सांगितले.

"मी लहान होतो, तेव्हा फार दंगा आणि गडबड करायचो. माझ्या आईला त्रास व्हायचा. तिचे डोके उठून जायचे. अति झाले म्हणजे ती अफूची एक बारीकशी गोळी माझ्या जिभेखाली ठेवायची. त्यामुळे माझी गडबड थांबायची व मला झोप लागायची. या अफूमुळे माझ्यावर कोणताही अनिष्ट परिणाम झालेला नाही. दारूची गोष्ट वेगळी आहे. तिच्यामुळे प्रकृतीची व पैशाची धूळधाण होते. सारे कुटुंबच धुळीला मिळते. आणि म्हणून सरकारने प्रथम दारूबंदीच केली पाहिजे."

अर्थात महात्माजींचे दारुबंदीसंबंधाचे ठाम मत आम्हांस माहीत नाही, वा ते आम्हांस दुसऱ्या कोणी येऊन सांगावयास पाहिजे असेही नाही. तसेच महात्माजींवरील आमची श्रद्धा, त्यांच्याविषयी वाटणारा आदर, आमच्यातील कमी झाला आहे असेही नाही. त्यांच्या पुण्यतिथ्या, जयन्त्या पूर्वीच्याच उत्साहाने आम्ही करीत आहोत. पण आमच्यातील काही अधिकारारूढ गांधीभक्तांना दारूबंदीबाबतचे महात्माजींचे विचार व्यवहार्य वाटत नाहीत, सक्तीच्या दारूबंदीने मूळ उद्दिष्ट साधत नाही, उलटपक्षी गावठी वा अनारोग्यकारक पेयांच्या आहारी लोक जातात, पोलिसांत व समाजात भ्रष्टाचार वाढतो, शासनास नाहक आर्थिक नुकसान सहन करावे लागते, त्यामुळे दारुबंदी तावडतोब गेली पाहिजे असे वाटू लागले आहे. काहीजण विचारतात, "अहो, भगवान श्रीकृष्णांना यादवांत दारूबंदी अंमलात आणता आली नाही, भागवतात त्याबद्दल दाखला आहे. तेव्हा विसाव्या शतकातील लोकमतानुवर्ती शासनास दारुबंदी कायद्याच्या बडग्याने कशी अंमलात आणता येईल? महाराष्ट्र शासन दारुबंदीसंबंधाच्या आपल्या धोरणाबाबत जनमानस चाचपून पहात आहे. नैतिक बाब असली तरी हल्लीच्या लोकसत्ता राज्यपद्धतीत या बाबतचा निर्णय बहुसंख्य जनांच्या मतांस अनुसरून घ्यावयास नको काय ?"

दारूबंदीच्या बाबतीत चालत असलेला हा खेळखंडोबा पाहून महात्मा-जींच्या आत्म्यास काय वाटत असेल यांचा त्यांच्या अनुयायांनी विचार करावा.

आमचे मन मात्र अत्यंत विषण्ण होते. ह्या खेळखंडोबाचे मुख्य कारण हे की हल्लीच्या परिस्थितीत भारतात 'मद्यपान' हा चोरी, मारामारी, दरोडेखोरी वगैरेसारखा नैतिक व सामाजिक गुन्हा आहे, आणि त्यापासून माणसास दूर ठेवण्यास कायद्याचा बडगा त्याच्यासमोर उभा करावयास हवा ही गोष्ट आम्हांस अद्याप पटलेली नाही. अशा तऱ्हेच्या कायद्याचे बडग्याने काम भागत नाही, त्याने दारुबंदी होऊ शकत नाही व निरनिराळया दुसऱ्या समस्या पुढे उभ्या रहातात, या म्हणण्यात काहीच अर्थ नाही. भारतीय दंडविधानाने चोरी, मारामारी, खून, दरोडेखोरी या सारख्या गुन्ह्यांचे निर्मूलन झालेले नाही, म्हणून भारतीय दंडविधानातील त्या संबंधीच्या तरतूदी नाहीशा करून शासनाने आपल्यापुरते या बाबतीत लोकांस वाटेल तसे वागू द्यावे असे जर कोणी सांगितले तर आपण काय म्हणू ? असो. या सर्वांचा तात्पर्यार्थ एवढाच की दारूच्या व्यसनापासून आपणा स्वतःस व आपल्या बंधु-भगिनींस मुक्त ठेवावयाचे असेल तर त्यासाठी शासनावर न विसंबता आपण स्वतःच आपल्या कंबरा कसून शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत.

## धैर्य, वा संयमाचा अभाव ?

नागपूरची एक वार्ता आहे: एक विवाह समारंभ व्हावयाचा होता. परंतु मुहूर्ताच्या आदल्या दिवशी रात्री वरपिता आजारी पडला व त्याचे पर्यवसान पहाटेस विवाहाचे दिवशी त्याचे निधन होण्यात झाले. वधूपक्षीयांना काळजी पडली. आलेल्या या दैवी आपत्तीने ठरलेला विवाह मोडला जाऊन वधूच्या जन्माचे अकल्याण होते की काय. पण वरपक्षाने धैर्य दाखवून वरपित्याचे और्ध्वदेहिक आटपून ठरलेल्या मुहूर्तावर नियोजित विवाह समारंभ पार पाडला. वार्ताहाराने म्हटले की या बाबतीत वर व वरपक्षीय माणसे यांनी आपला शोक आवरून ठरलेल्या मुहूर्तावर विवाह यथासांग साजरा करण्याचे जे धैर्य दाखविले ते कौतुकास्पद आहे.

आम्हांस यात वरपक्षाने काही कौतुकास्पद केले असे वाटत नाही. कदाचित हा आमच्या संकुचित वृत्तीचा परिणाम असेल. कदाचित प्रत्येक माणसाच्या ठिकाणी आवश्यक तो संयम असतो, व प्रत्येक माणूस आपल्या शब्दास जागण्याची शिकस्त करीत असतो, अशातऱ्हेच्या आमच्या चुकीच्या समजामुळे वरील घटनेचे आम्हांस यथायोग्य आकलन होऊ शकत नसेल. आम्हांस आपले असे वाटते की अशा दुर्घटनेच्या प्रसंगी ठरलेला विवाह ठरलेल्या मुहूर्तावर करण्याचा अट्टाहास उभयपक्षांनी न धरता रूढीप्रमाणे आशौचाचे दिवस संपल्यानंतर दुसऱ्या एखाद्या सुमुहूर्तावर साध्यासुध्या रीतीने विवाह साजरा करणे अधिक उचित झाले असते. अशा दुर्घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत आणि अशा वेळी संबंधित लोक आम्ही सुचविलेल्या मार्गाने गेलेले आहेत. कदाचित हल्लीच्या काळात---

(१) विवाहासारख्या आयुष्यातील महत्त्वाच्या बाबतीत पूर्वी वाटणारा पवित्रपणा आता वाटत नाही ;

(२) माणसांत परस्परांच्या शब्दांबद्दल पूर्वीचा आदर, विश्वास राहिलेला नाही;

(३) तरुण माणसांच्या आचारविचारांत आवश्यक तो संयम राहिलेला नसल्यामुळे आज एखादी गोष्ट करतो म्हणणारा तरुण मुलगा वा मुलगी उद्याही तीच गोष्ट करील अशी खात्री पालकवर्गात राहिलेली नाही ;

(४) आपल्या निकटजनांच्या बाबतीत थोडासा आदर बाळगणे, त्यांच्यासाठी थोडा त्याग करणे, संयम बाळगणे ही वृत्ती आमच्यात राहिलेली नाही ; आणि

(५) समाजाच्या धारणेसाठी कोणत्याही तत्त्वाला बाधक नसलेले आवश्यक ते रूढ विचार पाळणे इष्ट आहे असे आम्हांस वाटेनासे झाले आहे.

असे असल्यास मात्र आमची अवस्था चिंतनीय आहे, आणि त्यापासून आम्हांस आमची सुटका करून घेणे आवश्यक आहे, आणि तशी ती आम्हांस जोपर्यंत करून घेता येत नाही तो पर्यंत तरी नागपूरच्या घटनेतील वर व त्याच्या पक्षातील लोक यांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल कौतुकच केले पाहिजे !

## अस्पृश्यतेची भावना :

राजकीय व सामाजिक जीवनातून अस्पृश्यता जरी नाहीशी झाली आहे, तरी वैयक्तिक जीवनात ती अद्याप डोकावत असते. आजच्या काळातही काही लोक असे आहेत की स्पृश्यास्पृश्य भेद परमेश्वर निर्मित आहेत, आणि अस्पृश्याचे स्पर्शाने स्पृश्य बांधवाचे धार्मिक व आध्यात्मिक जीवन नाश पावते असे त्यांना वाटते. या बाबतीत गुजरातचे गव्हर्नर श्रीमान नारायण यांनी दोन किस्से सांगितले. भावनगरला एक स्पृश्य बाई आजारी पडली व तिच्यावर तातडीने ऑपरेशन करणे आवश्यक आहे असे आढळून आले. ऑपरेशन करण्यास तिची हरकत नव्हती. परंतु ऑपरेशनसाठी तिला जेव्हा ऑपरेशन थिएटरमध्ये आणले, तेव्हा तिला आढळून आले की ऑपरेशन करणारा शस्त्रवैद्य हरिजन आहे. मग ऑपरेशन करून घेण्याचे तिने नाकारले व सांगितले की मी मेले तरी चालेल, जिवंतपणी माझ्या शरीरास हरिजनाचा स्पर्श होता कामा नये. दुसऱ्या गोष्टीत गुजराथ सरकारने नेमलेल्या एका डॉक्टरला तो हरिजन असल्याचे आढळून आले तेव्हा त्यास आपल्या नेमणुकीच्या जागी रुजू होऊ दिले गेले नाही. अशा गोष्टी आता थोड्या आढळतात, परंतु त्या हे स्पष्ट दर्शवितात की अस्पृश्यता नष्ट केली असल्याबद्दल आपण कितीही गाजावाजा केला तरी स्पृश्यास्पृश्यतेच्या विषारी भावनेचे बीज अद्यापही आमच्या काही तथाकथित स्पृश्य बंधूंच्या हृदयात रुजलेले आहे, आणि त्याचा जोपर्यंत समूळ नाश होत नाही तोपर्यंत अस्पृश्यता नष्ट झाली आहे असे आम्हांस म्हणता येत नाही. श्री साईबाबांच्या भक्तांच्या बाबतीत आम्हांस

या बाबतीत काही करणे आवश्यक नाही, कारण श्रीसाईबाबांनी स्पृश्यास्पृश्यतेचे भेद कधीच मानले नव्हते. परंतु त्यांना आम्हांस विनंती करावयाची आहे ती ही की त्यांनी श्रीसाईबाबांच्या या बाबतीतील शिकवणीचा प्रसार सर्व लोकांत हिरिरीने करावा, व स्पृश्यास्पृश्यतेच्या भावनेचे विषारी बीज जनमानसातून पूर्णपणे उन्मळून काढण्यासाठी प्रयत्न करावा.

## भारताचे थोर बालक :

दिनांक १४ नोव्हेंबर हा पंडितजींचा जन्मदिवस बालकदिन म्हणून साजरा केला जातो. कारण पंडितजींचे जीवन व कर्तृत्व अत्यंत महान असले, तरी त्यांनी भारतीय जनमानसावर पगडा मिळवून तो आपल्या अंत:काळापर्यंत टिकविला होता त्याची मुख्य कारणे म्हणजे त्यांची बालकासारखी निरागस वृत्ती आणि बालक व फुले यांवर असलेले त्यांचे अमर्याद प्रेम.

या बाबतीत एक गोष्ट सांगतात ती ही की एका उन्हाळ्यातील सकाळच्या वेळी पंडितजी दिल्ली येथील चाणक्यपुरीतून जात असता त्यांची नजर अचानकपणे त्या भागातील दिल्ली नगरपालिकेच्या बागेतील आमराईकडे गेली. आमराईतील झाडे फळांनी नुसती लहडलेली होती. परंतु त्या फळांचा आस्वाद घेण्यासाठी कोणी बालबालिका तेथे नव्हत्या. सगळीकडे अगदी शुकशुकाट होता. पंडितजींना तो शुकशुकाट भयानक वाटला. दुपारी कामाच्या रगाड्यातून सवड मिळताच त्यांनी दिल्लीच्या मेयरना बोलावून घेतले, व बागेतील शुकशुकाटाचे कारण विचारले. मेयरसाहेबांनी सांगितले की पूर्वी मुले या आमराईत येऊन झाडांवर चढून सारे आंबे काढून घेत असत, आणि त्यामुळे या आमराईपासून नगरपालिकेला काहीही उत्पन्न मिळत नसे. म्हणून आमराईतील फळबहाराचा लिलाव करून तो मक्त्याने देऊन टाकला आहे व नगरपालिकेस दोन हजार रुपये उत्पन्न मिळालेले आहे. ठेकेदाराने सहाजिकच पहारेकरी ठेवून बालबालिकांना आमराईत येण्यास मनाई केलेली आहे. ही हकीकत ऐकून पंडितजी अत्यंत विपण्ण झाले, आणि त्यांनी मेयरना विचारले, "काय ? तुम्ही मुलांची खेळण्या बागडण्याची जागाच हडप करून टाकलीत ? त्यांच्या हसण्याबागडण्याच्या वृत्तीला बाध आणलात ? त्यांच्या मानसिक स्वस्थतेवरच ना देशाचे भवितव्य अवलंबून आहे ? मग आपणच त्यांना सुखसुविधा मिळवून द्यावयाच्या नाहीत तर कोणी ? हे राहिले बाजूला. उलट तुम्ही हा विचार वाऱ्यावर सोडून देऊन वेगळेच वागत आहात. . . . . . ठीक आहे. झाले ते झाले, पण आता आजच्या आज त्या ठेकेदाराच्या पहारेकऱ्यांना आमराईतून दूर करवा, व आमराईत पूर्वीप्रमाणे सर्व बालबालिकांना स्वच्छंदपणे वागडू द्या."

दोन आठवड्यानंतर पंडितजी फिरून त्या आमराईकडे गेले व तेथे सर्व देवदूत नाचत, बागडत खेळत असल्याचे पाहिल्यानंतर त्यांचे मन शांत झाले, प्रफुल्लित झाले.

भारताच्या या थोर बालकास आमचे मन:पूर्वक अभिवादन !

# पुण्यस्मरण :

## समर्थभक्त नानासाहेब देव:

धुळे येथील श्रीसमर्थवाग्देवता मंदिराच्या चालकांनी संस्थेचे संस्थापक वैकुंठवासी समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव यांच्या जन्मशताब्दि समारोहास गेल्या आक्टोबरमध्ये सुरुवात करून हा समारंभ धुळे येथेच नव्हे तर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यथोचितरीत्या वर्षभर साजरा केला जावा व यानिमित्ताने समर्थ रामदासांची शिकवण व वाङ्मय यांचा महाराष्ट्रभर भरपूर प्रचार व्हावा यासाठी ते प्रयत्नशील आहेत हे स्तुत्य आहे.

विसाव्या शतकात श्रीसमर्थवाङ्मयाची अनन्यनिष्ठेने सेवा करून त्याच्या प्रचारासाठी आपल्या अंतकालापर्यंत कायावाचामनेकरून कोणी झटले असेल तर ते नानासाहेब देवच, आणि या सेवेने त्यांनी सर्व मराठी भाषिकांस ऋणी करून ठेवले आहे. समर्थांच्या शिकवणीतील व वाङ्मयातील चैतन्यशीलता, या वाङ्मयाची व्यावहारिक उपयुक्तता आमच्या वाचकांस सांगावयास हवी असे नाही.

पूर्वायुष्यात नानासाहेबांनी अत्यंत यशस्वी रीतीने वकिली केली, त्यावेळच्या पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील कॉंग्रेसच्या राजकारणात ते १९२० पर्यंत अग्रेसर होते आणि त्यानंतरही राजकारणातून ते पूर्णपणे निवृत्त होईपर्यंत त्यांच्या सल्लामसलतीस जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांकडून मान दिला जात असे. आकर्षक व्यक्तिमत्व, रसाळ वाणी, विषयातील पारंगतता, भाषेवरील प्रभुत्व व यथोचित अभिनय यामुळे त्यांचे वक्तृत्व, मग ते श्रीसमर्थांच्या शिकवणीवर असो, राजकारणातील असो वा न्यायालयातील आपल्या अशीलाच्या बचावाचे असो, श्रोत्यांना अगदी मंत्रमुग्ध करीत असे. परंतु याही काळात श्रीसमर्थांच्या वाङ्मयाचे संशोधन व संपादन त्यांचे चाललेले होते. धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेचे ते चिटणीस होते. रामदास–रामदासी मासिक चालवीत होते, व श्रीसमर्थांचा दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, धाटया वगैरे ग्रंथांचे संशोधन व संपादन त्यांनी केले होते. श्रीसर्थांच्या चरित्रावर विस्तृत ग्रंथ लिहिले होते.

उत्तरायुष्यात श्रीसमर्थवाग्देवता मंदिर ही संस्था स्थापन करून तिच्या कामास त्यांनी आपणांस कायावाचामनेकरून वाहून घेतले. आपल्या अंत:कालापर्यंत तिचे काम अक्षरश: स्थितप्रज्ञवृत्तीने केले.

या थोर समर्थभक्ताच्या स्मृतीस आमचे आदरपूर्वक वंदन !

## महाराष्ट्रसारस्वतकार भावे :

दुसरे एक महान् साहित्यिक महाराष्ट्रसारस्वत व चक्रवर्ती नेपोलियन या विख्यात ग्रंथांचे लेखक यांची जन्मशताब्दि ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे दिनांक ६ ते ८ नोव्हेंबर १९७१ रोजी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. त्यांच्याही स्मृतीस आमचे वंदन !

दिनांक ६-११-१८७१ रोजी भावे यांचा जन्म पळसपे गावी झाला. त्यांचे वडील मिठाचे उत्पादक व व्यापारी होते. श्रीयुत भावे यांचे कायद्याचे शिक्षण

चालू असतांनाच वडील वारल्यामुळे त्यांना वडिलांच्या धंद्यात पडावे लागले. तो धंदा त्यांनी उत्तम तऱ्हेने करून त्यांत लक्षावधी रुपये कमावले. परंतु सेंट झेविअर कॉलेजमध्ये असताना त्यांना लागलेली इतिहास संशोधन व संतवाङ्मयाचे परिशीलन करण्याची आवड धंद्याच्या व कामाच्या रगाड्यात यत्किंचितही कमी झाली नाही, उलट ती सारखी वाढत राहिली, तिच्यासाठी धंद्यातून मिळणारा फुरसतीचा वेळ त्यांनी वेचला व त्याचीच परिणति 'महाराष्ट्र सारस्वत' व 'चक्रवर्ती नेपोलियन' यांच्यासारख्या अविस्मरणीय ग्रंथांत झाली. 'महाराष्ट्र सारस्वतात, भाव्यांनी मुकुंदराज, महानुभावपंथ, ज्ञानेश्वर, नामदेव वगैरे संतकवींचा व त्यांच्या वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. हा ग्रंथ वरवर चाळूनही भाव्यांच्या साक्षेपी संशोधक वृत्तीची वाचकास कल्पना येते. ग्रंथातील काही विचारांवरून संशोधकात जी समतोल वृत्ती असावयास पाहिजे, ती भाव्यांत पूर्णपणे नव्हती असे दिसून येते. काही ठिकाणी कुत्सित व संतापजनक टीका आहे. परंतु त्यामुळे भाव्यांच्या परिश्रमाचे व त्यांच्या ग्रंथाचे मूल्य कमी होत नाही. महानुभाव वाङ्मयाचे संपादन करून त्यास प्रकाशात आणण्याचे त्यांनी केलेले कामही अत्यंत मोलाचे आहे.

लक्ष्मी व सरस्वती एकत्र नांदत नाहीत असा सर्वसाधारण नियम आहे, पण भावे त्यास अपवाद होते.

श्री. स. गं. मालशे भाव्यांच्या बाबतीत म्हणतात :--

"काव्याइतकेच त्यांना शास्त्राचे वेड होते. पुस्तकाइतकेच त्यांनी पशुपक्ष्यांवर प्रेम केले. चर्मचक्षूंनी पाहायचे सौंदर्य त्यांनी न्याहाळले, तसेच अंतःकरणाच्या डोळ्यांनी मनोमन न्याहाळायचे सौंदर्यही त्यांनी आस्वादिले. ते जहाल राष्ट्रवादी असले तरी ते सनातन्यात मोडणारे नव्हते, तोंडाने फटकळ असले, तरी मनाने प्रेमळ होते. जसे चिकित्सक तसेच संवेदनाशील. परस्परविरोधी स्वभाव गुणांच्या मीलनातून घडलेले त्यांचे व्यक्तिमत्व खरोखरीच विलोभनीय वाटते."

## नाट्याचार्य खाडिलकर :

दिनांक २३-११-१८७२ रोजी नाटयाचार्य कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकर यांचा जन्म सांगली येथे झाला. त्यास दिनांक २३-११-१९७१ रोजी नव्याणव वर्षे पूर्ण झाली. दिनांक २३-११-१९७१ रोजी त्यांच्या जन्मशताब्दीस सुरुवात झाली आहे व दिनांक २३-११-१९७२ रोजी त्यांच्या जन्मास शंभर वर्षे पूर्ण होतील. आम्हांस खात्री आहे की त्यांच्या जन्मशताब्दीचा उत्सव महाराष्ट्रातच नव्हे तर इतरत्रही जेथे जेथे मराठी भाषिक आहेत तेथे तेथे अत्यंत उत्साहानें व उत्कटतेने सर्व वर्षभर साजरा होईल, कारण काकासाहेबांनी जी पंधरा नाटके लिहिली आहेत त्यांच्यापैकी बहुतेकांचा मराठी जनमानसावरील पगडा यत्किंचितही कमी झालेला नाही. अद्यापही कीचकवध, स्वयंवर, मानापमान यांसारखी नाटके प्रेक्षकांना आकर्षित करीत असतात. आणि काकासाहेबांनी ही आपली नाटके लोकांच्या औट घटकेच्या करमणुकीसाठी लिहिलेली नव्हती. ध्येयवादाने व राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या उत्स्फूर्त रचना अशीच ती नाटके होती. काकासाहेबांचे एक नातू शाहीर खाडिलकर काकासाहेबांवर रचलेल्या आपल्या पोवाड्यात म्हणतात :--

" कलेसाठी कला–हे खूळ मान्य नव्हतं याला ।
अश्लीलतेला नाही थारा दिला ।
कामुकता नाहीं दृष्टीला ।
बाष्कळपणा नाहीं नाटकाला ।
नवरस करुनिया गोळा ।
खेळवली नाटकांतून अद्‌भुतहि कला ।
॥ चाल ॥ कर्झन कीचक उभा करुनिया खवळवि लोकाला ।
भाउबंदकीने नाश झाले सांगे सकळाला ॥
सत्याकरता शस्त्र उगारून पत्नीच्या वरती ।
हरिश्चंद्र आदर्श ठेविला जनतेच्या पुढती ।
ध्येयापासून दूर कधींही जाऊ नका भुवनीं ।
बोध देतसे कच सर्वांला तो विद्याहरणीं ॥

१८९२ मध्ये बी. ए. ची पदवी मिळविल्यानंतर ते काही काळ सांगली हायस्कुलात शिक्षक होते. १८९६ साली लोकमान्यांनी त्यांना केसरीच्या संपादक मंडळात ओढले व तेथे ते १९१० पर्यंत होते. या काळात कर्झनशाहीवर टीका करणाऱ्या कीचकवधाने व बॉम्बचे रहस्य या लेखमालेतील त्यांच्या लेखांनी सरकारचा रोष त्यांच्यावर झाला व त्याची झळ केसरीस लागू नये म्हणून ११-१-१९१० ला त्यांनी केसरीचे संपादकत्व सोडले. पुढे ७-३-१९२३ रोजी त्यांनी नवाकाळ काढला व ओजस्वी, राष्ट्रप्रेमाने ओथंबलेले, परकीय सरकारास दाहक होणारे वृत्तपत्रीय लिखाण करण्याची हौस भागविली. साहजिकच हे वृत्तपत्र चालविणे त्यांस सोपे झाले नाही. तथापि त्यांच्या पुण्याईने त्यांचे पुत्र व पौत्र यांच्या कर्तबगारीने नवाकाळ आजही आपली वाटचाल काकासाहेबांनी घालून दिलेल्या मार्गानेच करीत आहे.

वय झाल्यामुळे वृत्तपत्राची जबाबदारी आपल्या नातवावर सोपविल्यावर ते विरक्त जीवन जगले, आणि या काळात—

" छंद लागला वेदान्ताचा करितो अभ्यास ।
स्थितप्रज्ञता आली अंगी झाला भवनाश ॥
॥ चाल ॥ उपनिषदावर भाष्य लिहोनी ।
मराठी वाङ्मय समृद्ध करुनी ।
नव्या दृष्टीने अर्थ लावुनी ।
कर्मयोग शिकविला जगाला वेदान्तामधून ।
मुनिवर्यांचें जीवन जगले काका संपूर्ण ॥ "

—शाहीर खाडिलकर.

काकासाहेबांच्या जन्मशताब्दिच्या प्रारंभाच्या निमित्ताने—

" रात्रंदिन जो राष्ट्रासाठी माशासारखा तळमळला ।
दिव्यासारखा सदाच जळला नमन तया कृष्णाजीला ॥ "

असे त्यांच्या नातवाप्रमाणे आपणही सर्वजण काकासाहेबांना नमन करू या !

# विचार मौक्तिक

## यक्षप्रश्न :

(१)

| यक्षप्रश्न | | युधिष्ठिराचे उत्तर |
|---|---|---|
| "आदित्य कां उगवतो ? | .. | ब्रह्माचे प्रेरणेने. |
| ब्राह्मणाचे दैवत कोणते ? | .. | वेदाध्ययन. |
| क्षत्रियाचे दैवत कोणते? | .. | धनुर्वेदाध्ययन. |
| पृथ्वीहून अधिक गुरु काय ? | .. | माता. |
| आकाशाहून अधिक उंच कोण ? | .. | पिता. |
| वायूहून वेगवान कोण ? | .. | मन. |
| तृणाहून अधिक विपुल काय ? | .. | चिंता. |
| उत्पन्न होऊनही हालचाल कोण करीत नाही? | | अंडे. |
| हृदय कोणाला नाही ? | .. | पाषाणाला. |
| गृहस्थाचा मित्र कोण ? | .. | भार्या. |
| आतुराचा मित्र कोण ? | .. | वैद्य. |
| उत्तम लाभ कोणता ? | .. | आरोग्य. |
| उत्तम सुख कोणते ? | .. | संतोष. |
| ब्राह्मणाला दान कशासाठी दिले जाते ? | .. | धर्मासाठी. |
| नटाला दान कशासाठी दिले जाते ? | .. | यशासाठी. |
| सेवकांना दान कशासाठी दिले जाते ? | .. | त्यांच्या पोषणासाठी. |
| राजांना दान कशासाठी दिले जाते ? | .. | त्यांना केवळ भीतीच्या पोटीच दान दिले जाते. |
| मनुष्य मृत कशाने होतो ? | .. | मानहानीने. |
| राष्ट्र कशाने नष्ट होते | .. | योग्य नेत्याच्या अभावाने." |

—संपूर्ण महाभारत, निवेदक श्री. गो. नी. दांडेकर, पृ. २०८ व २०९.

(२)

## सद्यःस्थितीचे आदि व एकमेव कारण—सांस्कृतिक शून्यता:

" "घोडा बिघडला कां म्हणून" ? "पान सडलें कां म्हणून?" आणि "पोळी जळाली कां म्हणून ?" तर, "फिरविलें नाही म्हणून." प्रश्न तीन, पण उत्तर एक. त्याप्रमाणेच, राज्ययंत्रांत इतकी शिथिलता कां आली ? इतकी वशिलेबाजी आणि खाबूपणा कां माजला ? व्यापारी राष्ट्रघातही करून व समाजाच्या जीवावर उदार होऊन निर्घृणपणानें इतके मतलबीपणा साधणारे कां बनले ? विद्यार्थ्यांत शिस्त मुळीच कां उरली नाही ? त्याचप्रमाणें आमच्या वाङ्मयाचेंहि तारूं कोणीकडे तरी हेलकावे खात चाललें आहे तें कां ? या सर्व प्रश्नांचें, आणि आणखी अशा अनेक

प्रश्नांचें उत्तर एकच :— 'सांस्कृतिक शून्यतेमुळे,' इंग्रजांनीं आमच्यावर मिळविलेल्या दोन विजयांपैकी राजकीय विजय आम्ही सुमारे तेरा वर्षांपूर्वी कसाबसा एकदाचा हरवला; पण जोपर्यंत त्यांनीं आमच्यावर मिळविलेला दुसरा जो प्राणघातक सांस्कृतिक विजय, तोहि आम्ही दूर करून टाकीत नाही, तोंपर्यंत 'इंग्रज या देशांतून गेला' हें विधान निव्वळ अर्थवादात्मकच आहे; आणि तोंपर्यंत आम्हांला खरोखरी स्वराज्य मिळण्याची प्रक्रिया पूर्ण झाली, हेंहि खरें नव्हे.

"याचा अर्थ असा नव्हे की, आम्ही त्यांच्या संस्कृतींतील चांगल्या गोष्टी, त्यांची यंत्रकला, व त्यांचे भौतिकशास्त्रांचे शोध वगैरे घेऊ नयेत. हे सर्व घ्यावे, व राष्ट्रभक्ति, कर्तव्यदक्षता, शिस्त वगैरे त्यांचे राष्ट्रीय गुणहि अवश्य घ्यावेत. पण आपण आपल्यांतील जें चांगलें आहे, ते सोडूं नये, व त्यांच्या जीवनदृष्टीच्या, व त्यांच्याकडून घेतलेल्या यंत्रकलेच्या किंवा भौतिकशास्त्राच्या शोधाच्या आहारी जाऊं नये. आपल्या संस्कृतीचा पाया पक्का कायम ठेवून, मग ह्या सर्व गोष्टी स्वीकारून त्या राबवून घेतल्या, तर त्या बिलकूल बाधक होणार नाहीत, इतकेंच नव्हे तर त्या साहित्याला, समाजाला व राष्ट्राला हितकारक, उपकारक, वृद्धिकारक व उन्नतिकारक होतील, नाहीतर बाधल्यावाचून राहणार नाहीत. विमानांत बसून उपनिषदें वाचावींत. भिलईच्या कारखान्याचा व्यवस्थापक हा हें जगद्व्याळ विश्वयंत्र व त्या विश्वयंत्राचें चालूं असलेलें आश्चर्यकारक संचलन ह्यांची आपल्या कारखान्यातल्या यंत्रांशीं मनातल्या मनांत तुलना करणारा असावा.

"यंत्रे आपण वापरतों कीं नाही, भौतिकशास्त्रांत आपण शोध लावतों आहोंत कीं नाहीं, ह्याचा हा प्रश्न नाहीं. हा जीवन दृष्टीचा प्रश्न आहे. तीच गोष्ट भिन्नभिन्न जीवन दृष्टींनी करतां येते. तीच गोष्ट करतांना आपली बैठक निरनिराळी असूं शकते. बैठक आपल्या संस्कृतीची आणि भौतिक शास्त्रांचे शोध आणि यंत्रे पाश्चात्यांसारखी, ह्यांची सांगड आपल्याला घालता आली तरच आपला ह्यापुढे जगांत निभाव आहे; नाहीतर यापैकी कोणत्याहि एकाच बाजूला आपण धरून बसल्यास पुढे बरे दिवस नाहीत. . . . . . . . . . . . . . .

"आपल्या साहित्याचीच काय, सर्वच गोष्टींची आज आहे ही शोचनीय स्थिती होण्याचे मूळ, व एकमात्रहि म्हणतां येईल, असें कारण म्हणजे आपली जीवनदृष्टी विचलित झाली, अस्थिर झाली, किंबहुना नाहीशीच झाली, आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष ह्या चतुर्विध अशा संपूर्ण पुरुषार्थांपैकी फ्रॉईड ह्यांना फक्त एक काम, आणि तोहि काहीसा विकृत रूपांतच कळला; आणि कार्ल मार्क्स यांना फक्त अर्थ, आणि तोहि काहीसा विकृत रूपांतच कळला, आणि या दोघांची तत्त्वें मिळून अर्धें मानवी जीवनाचें कसेंबसें आकलन त्यांना आतां झालें आहे, असें म्हणता येईल. पण येथवर येतांच 'धर्म' पाश्चात्यांतील अग्रेसर विचारवंताना स्पष्टपणे डोळयांपुढे दिसू लागला आहे. आईन्स्टाईन् वेगवेगळया जागी म्हणतात :—

"धर्मावांचून भौतिकशास्त्रें लंगडी आहेत." ...............

"मी ठामून सांगतों की, विश्वात्मक आध्यात्मिक (धार्मिक) अनुभव ही सर्वांत प्रबल आणि उदात्ततम अशी आकर्षणाची शक्ति आहे." ......

"आपल्या अनुभवाला येणारी सर्वांत सुंदर भावना म्हणजे गूढाची होय. सर्व खऱ्या कलेचें आणि भौतिक शास्त्रांचें बीं ही गेरले. ज्यांची या भावनेची ओळख नाही, ज्याला आश्चर्य वाटेनासें झालें आहे, किंवा आश्चर्यानें स्तिमित होऊन जो उभा राहत नाही, तो मेल्यासारखा आहे." ...............

सुलिव्हन म्हणतात ; :—

"जर उत्क्रान्तीच्या प्रक्रियेला कांही हेतू आपल्याला लावावयाचा असेल, तर चैतन्याची वाढ हा उत्क्रांतीच्या हेतूंपैकी एक हेतू राहत आला आहे असें दिसतें. जीवाणूपासून तों माणसापर्यंतच्या वाढींत अत्यंत डोळ्यांत भरणारी वाब आपल्याला चैतन्याची वाढ हीच निश्चितपणे दिसते."

"ज्यांनी जडवादापासून सुरुवात केली त्या पाश्चात्य भौतिक शास्त्रवेत्त्यांचे विचार येतां येतां अखेर येथवर आल्यावर, निदान सहा-आठ हजार वर्षें हेच विचार असलेल्या आपण ते आता सोडून देऊन पाश्चात्यांचे जुने विचार घ्यावे, ह्याहून आश्चर्यकारक व दुःखकारक ते काय ?"

—प्रा. **बळवंत गणेश खापर्डे**, साहित्याचा संसार, पृ. १३४ ते १३७

(३)

## संस्कार घडविण्याचे कार्य :

आक्टोबर १९७१ मध्ये पूज्य साने गुरुजींच्या जन्मभूमी परिसरात दापोलीत भरलेल्या साने गुरुजी कथामालेच्या १४ व्या अधिवेशनच्या अध्यक्षपदावरून बोलताना महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री **मधुकरराव चौधरी** यांनी खालील विचार व्यक्त केले.

"कथामालेने हाती घेतलेले संस्कार घडविण्याचे कार्य न संपणारे व अवघड आहे. पण ते समाजाच्या धारणेसाठी आवश्यक आहे. ते हाती घेतले नाही तर मानवी प्रगतीच्या वाटचालीला अर्थ उरणार नाही. चंद्रावर माणसाने पाय ठेवले हे खरे ! पण पृथ्वीवर त्याला माणसासारखे वागता येत नाही, ही शोकांतिका आहे ! भौतिक प्रगतीचा विकास मानवी मन संकुचित राहिले तर व्यर्थ ठरेल.

मुलांच्यावर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न कथामाला करीत असतानाच दुसऱ्या बाजूला चित्रपट, चित्रे, वाङ्मय आदि माध्यमातून अत्यंत वाईट व बीभत्स कुविचार समाजापुढे अधिक जोरदारपणे येत आहेत. सर्व वातावरण गढूळ होत आहे. त्यामुळे कथामालेला दोन्ही आघाड्यांवर कार्य करावे लागणार आहे. एका बाजूला मातृत्वाच्या वात्सल्याने मुलांच्यावर संस्कार घडवीत असतानाच दुसऱ्या बाजूला फैलावणारे कुविचार रोखण्यासाठी विचारवंतांची संघटना उभारावी लागेल. ज्या कुंचल्यातून, लेखणीतून वा दृश्यांतून वाईट विचार प्रसृत होतात, त्यांचे हात रोखावे लागतील. महिलांनी या बाबतीत आघाडी उघडली पाहिजे."

(४)

## जीवनांतील रम्य व भव्याचे दर्शन :

"जें रम्य आहे नि जें भव्य आहे त्याचें दर्शन खेडेगांवांतच घडते. पावलो पावलीं परमेश्वर तुमच्याशीं बोलत असतो तिथें. त्याची कृपा नदीच्या रुपानें तुमच्या घराजवळून वहात असते. शिवारामधल्या शेतांत डोलणाऱ्या पिकांवरचा वारा परमेश्वराचा सुवासिक श्वासच प्रतिक्षणीं घेऊन येतो.

"जेथें नदी नाहीं आणि शेतें नाहींत तें का माणसांना राहण्याचे ठिकाण असतें ? चाळीमध्यें आणि नळावर जीवन कसें भेटणार ? नळ सोयीस्कर असतील पण त्यांतून जीवन नाहीं पाणी वहातें. म्हणून शहरीं जीवनांत चैतन्य नसतें. दारांसमोर पेट्रोल पंप अन चहाचें दुकान बघून कशी स्फूर्ति येणार ? सात मजल्यांच्या इमारती आणि गिरण्यांची उंच उंच धुराडीं ध्येयवाद कसा जागृत करणार ? माणसांच्या शरीरांना हलावयाला जिथें जागा नाहीं, तेथें त्यांचीं मनें कशी भराऱ्या मारणार? जिथें अंगाला वारा झोंबत नाहीं अन् डोळयांना आभाळ दिसत नाहीं , तिथें अंतराळातला विस्तव कसा प्रज्वलित होणार ? खेडेगांवांत उठले कीं डोंगराचें उंच शिखर पहिल्यानें दृष्टीस पडतें. ते माणसाच्या पौरुषाला आव्हान देते. नदीच्या थंडगार अन् वाहत्या पाण्यांत आंघोळ करतांना चैतन्यरसांत डुंबल्यासारखें वाटतें. अन् शरीरांतला कणन्‌कण खडबडून जागा होतो. उन्हातान्हाच्या भट्टींत शरीर भाजून निघाल्याखेरीज कां त्यांतला 'पुरुषोत्तम' कधीं प्रगट होईल ?"

—प्रल्हाद केशव अत्रे, आलेय १९७१, पाने ९३ व ९६.

(५)

## मानसिक शृंखला व त्याचा उच्छेद :

"अस्पृश्यता (स्पर्शबंदी) व जातिभेद (बेटीबंदी) यातून अनेक प्रकारच्या बंदी कशा निर्माण झाल्या आणि त्यामुळें कोणती अनर्थपरंपरा ओढवली याचे बॅ. सावरकरांनी फार उत्कृष्ट वर्णन केले आहे. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी सिंधुबंदी (परदेशगमन-निषेध), शुद्धिबंदी (पतितांना परत स्वधर्मात घेण्याची मनाई) रोटीबंदी आणि बेटीबंदी यांना सावरकर सात स्वदेशी बेडया, सात स्वदेशी शृंखला म्हणतात. म्लेंछ, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी यांनी आपल्याला जिंकून आपल्या पायांत बेडया घातल्या त्या परदेशी बेडया होत. पण त्या बेडया आपल्या पायांत पडल्या याचे मुख्य कारण हे की हे शत्रू येथे येण्यापूर्वी आपणच आपल्या पायात या सात बेडया ठोकून स्वतःच करंटेपणाने परतंत्र होऊन बसलो होतो.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

"शब्दप्रामाण्य, ग्रंथनिष्ठा, श्रुतिस्मृति-पुराणोक्त व अपरिवर्तनीयता, यांनून आपल्या सात स्वदेशी बेड्या निर्माण झाल्या आहेत. तेव्हा त्यांचा उच्छेद करावयाचा तर शब्दप्रामाण्यादि रूढींचा प्रथम उच्छेद केला पाहिजे. या सर्व शृंखला मानसिक असल्यामुळे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम विज्ञान, आणि विवेकी वृत्ती या शस्त्रांनीच त्या तोडता येतील.

"स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दिव्य जीवनाचा विचार करता त्यातले अनेक रोमहर्षक प्रसंग आपल्या डोळ्यापुढे उभे रहातात. त्यांना हिंदुस्तानात घेऊन येणाऱ्या बोटीतून त्यांनी फ्रान्सच्या सागरात उडी घेतली तो प्रसंग त्या सर्वांत अद्भुत-रसपूर्ण होय. पण माझ्या मते रत्नागिरीस त्यांनी जे सीमोल्लंघन केले, ते त्यांचे हिंदुसमाजाला सर्वांत मोठे देणे होय. पहिल्या विक्रमाने त्यांनी पारतंत्र्याच्या शृंखलेवर घण घातला. पण दुसऱ्या विक्रमाने भारताच्या कपाळी ज्या शृंखलेमुळे पुन्हा पुन्हा पारतंत्र्य येत होते त्याच्यावर घण घातला, आणि ती छिनून टाकली. पहिल्या विक्रमाने स्वातंत्र्यवीर स्वतः मृत्युंजय झाले, दुसऱ्याने हा हिंदुसमाजच मृत्युंजय होईल' अशी आशा वाटते."

—डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, वैयक्तिक व सामाजिक पु. १३५, १४१, १४२.

---

# आर्त भक्ताची नित्य प्रार्थना

आर्त - श्री. विश्वनाथ केशव छत्रेशास्त्री

आर्या

साई बाबा ! सदया ! फिरफिरुनी संकटांत सांपडतो।
तारा यातुन सत्वर, नाहितरी पारपार मी बुडतो ॥१॥
कनवाळु संत मोठे, भावे जातील त्यास जे शरण।
रक्षुनि त्यांस निजांगे, संकटीं; चुकवीति जन्म नी मरण ॥२॥
बहु थोर भाग्य म्हणुनी, दर्शन घडले मला विनायास।
बाबा समर्थ असता, वाण कशाची पडेल भक्तास ॥३॥
संकट उपकारक हे, श्रद्धा जडलीहि आपुले ठायी।
तनु गेली तरि न ढळो श्रद्धा; ही प्रार्थना असे पायी ॥४॥
गेले एक तरी ते दुसरे; हो निश्चये पुढे येते।
सत्संगती मिळाली; मनुजा ते तरि सुसह्य होते ते ॥५॥
राहो अथवा जावो, संकट; द्या साधुसंगती माते।
याविण दुजे न मागे; पुरवा या एकमात्र कामाते ॥६॥

# चिंतन

( अभंग )

रचयिता- श्री. शाम जुवळे.

जेथे पाहतो मी तेथे, तूचि नारायण।
नयन झाकिताही तेथे, येशि तू धावून ॥१॥
दिसे इथे काहिच ना ते, रिते तूजवीण।
सर्व ठायि भरुनी उरसी, तरिही तूचि पूर्ण ॥२॥
दर्पणी मी पहाता रूप, माझे मी म्हणून।
तेथे तू दाविसि आपुली, निजत्वाचि खूण ॥३॥
घडे कर्म त्यातहि असते, मूर्ती तुझी छान।
भक्तिभावे गाता गीत लागे तुझे ध्यान ॥४॥
शब्द स्फुरति जेथुनि तेथे, तुझे कृपा-स्थान।
स्मृति तुझी ती तरि मजसी, दयेचीच खाण ॥५॥
जन्मोजन्मी देई मजसी, हेचि एक दान।
तुझ्या चिंतनाविणा काही, नकोच ते आन ॥६॥

-- भगवान श्रीसाईनाथार्पणमस्तु --

# विटेवरी उभा

कवि : श्री. स. कृ. काळे, चित्रकार.

अहोरात्र जागा विटेवरी उभा ।
जाणोनी भक्तांच्या हृदयातील गाभा ॥
भक्त कोटयवधी, धावून येती दर्शनास ।
आनंदून आशीर्वाद मिळती सकलांस ।
नामाच्या नाम गजरात दुमदुमते विश्व ॥
सर्वच काही व्यापून राहिले हे दिव्य ।
हितगुज प्रत्येकाचे, मायेपोटी हृदयात ॥
ज्यास जे पाहिजे ते हळुवार देण्यात ।
नाखूष न होई, कोणी पांडुरंग दरबारात ॥
देखभाल भक्तांची आदरे मनांत ।
असा हा महिमा अनेक कालचा पंढरीत ॥
ज्ञानदेव तुकाराम आदि भक्तांचा क्षेत्रात ।
वारकरी कलियुगातील पावन होती दर्शनाने ।
असे हे कृपाळु दैवत उभे सातत्याने ॥

# पारा सत्कर्मांचा

कवि : श्री. स. कृ. काळे , चित्रकार

स्थितप्रज्ञ तो आरसा
घरोघरी शोभालंकार खासा
सेवेस तत्पर सदा
नाही पहात तोटा फायदा
मुखवटा ज्याचा जसा असेल
खरे रूप त्यात दिसेल
नाही बनवाबनवी हृदयात
स्वच्छ अंतःकरण जगतात
लाभता काच पुण्याईची मानवास
पारा सत्कर्माचा लावावा त्यास !
आत्मरूप दिसेल त्यात
सार्थक जन्माचे होईल जीवनात !

# विचार येता मृत्यूचा

कवि : श्री. स. कृ. काळे, चित्रकार.

विचार येता मृत्यूचा , जीव होतो घाबरा
न चुके कोणा, पृथ्वीतलावरील जीवा !
होऊन गेले अनेक सत्कर्मी आणि सर्वसाधारण
कोणाचेही मृत्यूच्या तावडीत नसे मीपण,
न सोडवी कोणी अंतकाळी कोणास
जिवलगाचेही पुण्य न मिळे जीवास
असता मृत्युशय्येवर, दिसतो सर्व आढावा
काळाच्या काल गतीतील पापपुण्य मामला !
काळाचे चक्र सुसंगत चाले जगतात
ठेव चित्रगुप्ताजवळील नेमकी त्यावेळेस
पश्चात्तापे पुनर्जन्म मिळेल का ? ही आशा
चालू घडीचा डाव विस्कटता मृत्यू घाला

# श्रीहरीची खूण

कवि : श्री. तुकाराम गंगाराम चव्हाण

नित्यरूप अवघा असे नारायण, पटवून द्यावी त्याची खूण।
अंतरात असता नाही ओळखण, कस्तुरी पोटी असता मृग फिरे रान ॥
बाह्य प्रकाश पटवी न खूण, त्यामुळे वाया करशी भ्रमण ।
सोपी युक्ति फार करू नको शीण, आपलेपणाचा उबग सोड जाण।
उगा रहाता पटते खूण, अंतरात जागे अंतःकरण ॥

# अनंताचे प्रमाण

कवि : श्री. तुकाराम गंगाराम चव्हाण.

भावरूप व्हावे तयाने जाणावे, हरीचेच नाते त्यानेच गावे।
चैतन्य भाव सदा उगवावे, हरिरूप वाढते स्वभावे ॥
प्रमाणाची गोष्ट तेव्हा मालवे, अनंताची जाग तेव्हा उगवे।

# मराठीचे महाकवी–उत्तरार्ध

लेखक-श्री. ठकार गुरुजी

## सहज सुलभ आत्मसाक्षात्काराचा मार्गः

ज्ञानदेवांनी परमेश्वर भक्तांचा, 'स्त्रिया बाळां। तोय तरणी।' असा सर्वांना सहज आटोक्यात असलेला मार्ग रसाळपणाने आपणांस दाखविला आहे ! या मार्गाने,

**आणि संसारदुःखा मोकळवणें। विकृतीविण। ज्ञा. ४-२१९,**

फारसे कष्ट न करता संसार दुःख दूर होईल. साखरेने रोग जातो, तर कडलिंब कशाला ?

**रोगु जाये दुधें ओगरें। तरी नींबु का पियावा॥ ज्ञा. ४-२२०**

इंद्रियाला कष्ट न पडता, हठयोगाचा आश्रय न घेता मोक्षप्राप्ती आहे.

**तैसा मनाचा मारु न करितां। इंद्रिया दुःख नेदितां॥**

**एथ मोक्षु असे आइकतां। श्रवणामाजी॥ ज्ञा. ४-२२१**

तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे

**न लगे सायास न जाणे वनांतरा। सुखें येतो घरा नारायण॥**

असा सर्वसुलभ भक्तिमार्ग ज्ञानदेवांनी स्त्रिया, शूद्र व सर्व चातुर्वण्य समाजाला खुला केला. जातिभेदाची कवाडे नष्ट केली. व सर्व समाजात

**समता वर्तावी। अहंता खंडावी॥**

**येणेंचि होय पदवी। मोक्षमार्ग॥**

असा समानतेचा मार्ग आचरून समाजात नवजीवन, नवचैतन्य व नवा उत्साह निर्माण केला. फ्रेंच तत्वज्ञ रुसो म्हणतो, "जन्मानें सर्व माणसें समान असतात." पण आधिभौतिक अशा या साम्यवादापेक्षा आध्यात्मिक उच्च भूमिकेवरून सर्वांना कंठरवाने सांगितलेला,

**जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत॥**

**हा भक्तियोग निश्चित। जाण माझा॥ ज्ञा. शालिग्रामप्रत १०-११७**

हा भक्तियोग कितीतरी पटीने विशाल व व्यापक आहे. पद्मभूषण काकासाहेब कारखानीस एकदा गुरुदेव रानडे यांस म्हणाले, "रामभाऊ, ज्ञानेश्वरीत कोणता मार्ग आहे ?" गुरुदेवांनी उत्तर दिले, "गणपतराव, उगाच कशाला कडबा चघळता ? ज्ञानेश्वरीत एकच मार्ग म्हणजे भक्तिमार्ग सांगितला आहे."

**जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें॥ ज्ञा. ९-५११**

**खंती करिती कर्माची॥ गांवढीं नां॥**

भक्तियोगाबरोबरच ज्ञानेश्वरांनी सर्वांनी आपली कर्तव्यकर्मे केलीच पाहिजेत असा स्पष्ट आदेश दिला असून संन्यास म्हणजे कर्मफल त्याग हा अर्थ लोकांना शिकविला

आहे. संन्यास व कर्मयोग हे दोन्ही ही सारखेच मोक्षप्रद आहेत असा लोकमान्यांचा गीतारहस्यातील संदेश लोकमान्यांच्या पूर्वी ६०० वर्षे महाराष्ट्राला दिला हे विशेष होय. कर्मयोगालाच ज्ञानदेवांनी 'स्वधर्म', 'जातिस्वभावें आलें', 'नित्यकर्म' अशी नावे दिली आहेत व निष्काम कर्मयोगाचा पुरस्कार केला आहे. हे पाहिले म्हणजे गीतार्थ लिहिताना ज्ञानोबांची दृष्टि किती समाजहितपर होती हे स्पष्ट होते. देह आला की कर्म चुकत नाही.

**हां गा सव्यसाची। मूर्ति होउनी देहाची॥**
**खंती करिती कर्माची । गावढीं नां - ॥** ज्ञा. १८-२१६

**हां गा शरीर जरि जालें। तरी कर्तव्य हें ओघें आलें॥**
**मग उचित कां आपुलें। आसंडावे ॥** ज्ञा. ३-१४४

असा रोकडा प्रश्न करून,

**तें सुखें आपुलां घरीं।कुटुंबे सीं भोजन करी ॥** ज्ञा. १२२

असें सांगून 'नियत कर्म कामनारहित होऊन करावे' म्हणजे आपोआप

**ते कैवल्य परम तत्वता। पातले जगीं ॥** ज्ञा. ३-१५०

असा निर्वाळा देतात. हे ही शक्य नसल्यास

**तरि उचित कर्मे आघवीं। तुवा आचरौनि मज समर्पावी॥**
**परि चित्तवृत्ति हे न्यसावी। आत्मरूपी ॥** ज्ञा. ३-१८३

हाच संन्यासयोग आहे अशी त्यांची शिकवण आहे. 'स्वधर्म कठिण असला तरी केलाच पाहिजे' असे सांगून दुधाचा मोह न ठेवता गुराखी दुसऱ्या गाई पाळतो, त्याप्रमाणे कर्मफळाची इच्छा न ठेवता कर्मे करावी ' '**हा चांग । निरोप माझा॥**' असा कर्मयोग शिकविला. इंद्रिये न कोंडता हटयोगाचा आश्रय न घेता आपली सर्व कर्म निवांतचि अर्पिजे माझ्या ठायीं,' असा, नदी तरून जाण्यास 'क्रिया बाळा तोयतरणी' अशी नाव असणारा सर्वांना सुलभ मोक्षप्रद निष्काम कर्मयोगाचा ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी पुरस्कार केला आहे. संन्यास व कर्मयोग हे 'मोक्षकर तत्वतः दोन्ही ही होती' असा निर्वाळा देऊन कर्मयोग हाच आपल्या जीवनाचा ओलावा आहे.

**विहित कर्म पांडवा। आपुला अनन्यु बोलवावा॥**
**आणि हेचि प्रेमसेवा। सर्वात्मकाची ॥** ज्ञा. १८-९०२

अशी कर्मयोगाची विशुद्ध व पवित्र बैठक तयार करून शेवटी आपल्या कर्तव्यरूपी फुलानेच परमेश्वराची पूजा करावी,

**तेया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म कुसुमाची वीरा॥**
**पूजा केली होये अपारा । तोखालागी ॥** ज्ञा. १८-९१३

असा समाजकल्याणाचा दिव्य संजीवनी मंत्र ज्ञानदेवांनी दिलेला पाहून मन आश्चर्याने व आदराने थक्क होते!

'तेया सर्वात्मका देवा' ही ओवी सर्वोत्कृष्ट असून त्यात कोणत्याही देवाचे, धर्माचे, प्रेषिताचे नाव दिलेले नाही. म्हणून ती 'विश्वधर्म' 'Universal religion' होण्यास व सर्वांस शिरोधार्य होण्यास अत्यंत पात्र आहे असे माझ्या अल्पमतीस वाटते.

## लोक संग्रहार्थ कर्म :

गीतेतील अर्जुन अज्ञानी होता, त्याला कर्मयोगाचा उपदेश करणे इष्ट होते पण कर्म योगाने चित्तशुद्धी व ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर ज्ञान्याला कर्म करण्याची जरूरी नाही, कारण, 'तस्य कार्यं न विद्यते' असे गीता सांगते. पण समाजकल्याणाचा मार्ग सांगिण्याकरिता गीतार्थ सांगणारे ज्ञानदेव सर्व समाजाचे हित कशात आहे हे स्पष्ट करीत होते. म्हणूनच ज्ञानदेवांनी 'ज्ञानी पुरुषांनी' लोकांना शिकविण्याकरिता लोकसंग्रहार्थ कर्मयोग आचरून दाखवावा असा स्पष्ट संदेश दिला आहे.

**देखें प्राप्तार्थ झाले। जे निष्कामता पातले ॥**
**तेयां हीं कर्तुत्व असे उरले। लोकालागी ॥ ज्ञा. ३-१५४**

असे सांगून 'जनकादिक राजे उपकारेल' या सद्‌भावनेने कर्म करीत होते. तो आदर्श आपल्यापुढे ठेविला. ज्ञानी पुरुषांनी निष्काम कर्म कसे आचरावे हे लोकांना न शिकविल्यास समाजास कसे कळेल असा प्रश्न करून

**मार्गी अंधासरिसा। पुढां देखणा ही चाले जैसा ॥**
**अज्ञा प्रकटावा धर्मु तैसा । जाणतेन ॥ ज्ञा. ३-१५५**

असा आदेश दिला आहे, व

'एथ वडील जें जे करिती ! तेया नांव धर्मु ठेविती !'

अशी स्थिती समाजाची असल्याने ज्ञानी पुरुषाने निष्कामकर्मयोग आवश्यक केलाच पाहिजे

**म्हणोनि समर्थु जो एथे। आणि लाणि सर्वज्ञते ॥**
**तेणें सविशेष कर्मातें। त्यजावें ना ॥ ज्ञा. ३-१६६**

असा समाज विकासाचा मार्ग आचरलाच पाहिजे, असाच स्पष्टार्थाने पुरस्कार केला आहे हे विशेष होय.

## आदर्श पुरुषः

आत्मसाक्षात्कार झाल्यावर समाजकल्याणाकरिता आपले आयुष्य व्यतीत करणारे आदर्श पुरुष कसे असतात ह्याचे अनेक तत्त्वज्ञांनी नितांत रम्य वर्णन केले आहे. भगवद्‌गीतेतील स्थितप्रज्ञ, प्लेटोचा तत्त्वज्ञ राजा, कँटचा ध्येयप्रधान राज्याचा स्वामी किंवा अरविंदाचा परमेश्वरी पुरुष हे आदर्श पुरुष होत! अशा आदर्श पुरुषाचे वर्णन करताना ज्ञानदेवांच्या काव्याला अथांग भरती येते! वाघ आणि गाय ह्यांना सारखेच असलेले पाणी, तोडणारा किंवा लावणारा ह्यांना सारखीच सावली देणारे

झाड, गरीब श्रीमंत सर्वांना सारखेच चांदणे देणारा चंद्र, यासारखा जगाचे पाप फेडणारा, तीरावरील वृक्ष पोषणारा, लोककल्याणाच्या गंगेच्या प्रवाहात बुडी मारणारा असा आदर्श पुरुष ज्ञानदेवांनी निर्माण केला आहे. या आदर्श पुरुषांची मानवजात कशी असेल हे भव्य व दिव्य स्वप्न ज्ञानदेवांच्या तरल प्रतिभेपुढे तळपून गेले. ते आदर्श समाजाचे स्वप्न या महाकवीने आपल्या 'अमृतातें हि पैजा जिंके' अशा ओव्यांनी साकार केले, तेच त्याचे 'पसायदान' आहे. 'पसायदान' हे मागणे नाही; ते या महाकवीच्या प्रज्ञाचक्षूंसमोरून तरारून गेलेले रम्य सौंदर्य-स्वप्न आहे, त्याच्या प्रतिभेच्या चंद्राच्या पौर्णिमेच्या सर्वोत्कर्षाचा झळाळणारा तेजस्वी सर्वोच्च मानबिंदू आहे ! ! !

**विश्व होऊनि विचरे। विश्वामाजी ॥**

असे हे शाश्वत आनंदाचे, कीर्तीचे परंधाम महाकाव्य इ. स. १२९० मध्ये तयार केल्यावर श्रीज्ञानेश्वरांनी नंतरची सहा वर्षे समाजविकास, लोकसंग्रह व लोककल्याण करण्यात, पदयात्रा करण्यात, नामसंकीर्तन करून लोकजागृती करण्यात घालविली.

**हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जेयाची स्थिर ॥**
**किंबहुना चराचर । आपण जाला ॥ ज्ञा. १२-२११**

अशी विश्वात्मक बुद्धी ठेवून ज्ञानेश्वरांच्याच अहिंसेच्या व्याख्येप्रमाणे

**आणि जगाचेया सुखाचि दोसें। शरीरें वाचा मानसें ॥**
**राहाटणे ते अहिंसे । रूप जाण ॥ ज्ञा. १६-११३**

असे सर्वांच्या सुखाकरिता चंदनाप्रमाणे झिजून प्रा. फाटक म्हणतात त्याप्रमाणे भावी इस्लाम धर्मियांच्या आक्रमणांच्या प्रतिकारांचे सामर्थ्य व मनोधैर्य समाजात निर्माण करूनभागवतधर्माच्या समतेची ध्वजा उंच उंच फडकावून आपल्या कीर्तीचा, यशाचा व लोकप्रियतेचा चद्रंमा शरद् ऋतुंतील पौर्णिमेप्रमाणे मध्यबिंदूवर तळपत असतांनाच कार्तिक व. १३, शके १२१८, इ. स. चा दिनांक २६-१०-१२९६ रोजी ज्ञानेशांनी समाधि घेतली, वैभवाच्या निर्याणात निर्याणाचे वैभव मिळविले. सोन्याचा तुरा लुटून आपला निरोप घेतला !

आज त्यांचे पुण्यस्मरण करीत असताना त्यांनी महाराष्ट्रावरच नव्हे तर भारतावर, नव्हे अखिल मानवजातीवर सौंदर्याची सौख्याची व मांगल्याची उधळण करावी अशी त्यांची प्रार्थना करून त्यांच्याच शब्दांत तयार केलेली ही आदरांजली त्यांनी म्हटल्याप्रमाणे

**भरोनि सद्भावाची अंजुली। मिया ओविया फुले मोकली ॥**
**अर्पिली अंघ्रियुगली । विश्वरूपाच्या ॥ ज्ञा.**

श्रीज्ञानेश्वर माउलीच्या चरणी नम्रपणे व भक्तिभावाने अर्पण करतो !

---

# हिमालयाची यात्रा

लेखक ग. नी. पुरंदरे

(मागील अंकावरून पुढे चालू)

पहाटे ४ वाजता उठून शौचमुखमार्जन करून गाडीमध्ये बसलो. गाडया ५ ला निघाल्या. येथून मात्र थंडी वाजू लागली. पिप्पलकोटीची उंची ५ हजार फूट आहे. सकाळी उजाडल्यावर व तेथे उजाडतेही लवकरच. एक नवेंच आम्ही कधीही न पाहिलेले असे दृश्य पाहिले. चोहीकडे पर्वत शिखरांवर ओल्या नारळाचा कीस टाकल्या सारखे दिसत होते, हिमाच्छादित शिखरे दिसू लागली. खुद्द आमच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोठमोठे बर्फाचे कडे दिसू लागले. त्या मधून बर्फ फोडून रस्ते काढलेले, त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस पांढऱ्या दरडी व त्याच्या तळातून पाणी ओघळून वाहात चाललेले. बर्फाच्या डोंगरावरून मधून मधून ठिपके व दगडपण साधारण पण पृष्टभाग सपाट पण रंग काचेसारखा नसून पांढऱ्या शुभ्र मेणाप्रमाणे. हे बर्फाचे थर पुष्कळच जाड असून मला वाटते कधीही वितळलेलेच नसावेत. कारण उन्हाळ्यात जर हे वितळले जात नाहीत तर हिवाळयात व पावसाळयात अधिक जाड होत असतील. त्यांच्या खालची जमीन सदैव बर्फाखालीच गाडलेली असावी. एखादेवेळी जड असा हिमपर्वत ( Glacier ) आपल्या वजनाने खाली खाली सरकत दरीत पडावा तेव्हाच त्याच्या खालची जमीन हवेला उघडी व्हावयाची. पण पुन्हा थंडीने बर्फाचा थर त्या जमिनीवर बसू लागायचाच. असे काही हिम प्रवाह दरीत उतरताना आम्हाला दिसले. वाटेत एखाद्यावेळी बर्फाचा कडा कोसळला तर रस्ताच बंद होतो. पण अशा संभाव्य ठिकाणी बर्फ फोडण्याची यंत्रे ( Ice-breakers ) ठेवून दिलेली आहेत. जसजसा दिवस वरती येऊ लागला व सूर्याचे तिरपे किरण डोंगरावरून पसरू लागले तसतसे बर्फावर त्या किरणांचे परिवर्तन होऊन डोंगराचे माथे चकचकीत तळपू लागले. व परिवर्तित किरण आसमंतात पसरून जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश भरू लागला. एकंदर वातावरण तेजस्वी व दैदीप्यमान दिसू लागले. जशी एखाद्या मंडपामध्ये किंवा दिवाणखान्यामध्ये दिव्यांची रोषणाई करावी तशी निसर्गाने त्या पर्वतराजींवर सूर्यप्रकाशाच्या सोनेरी किरणांची दिवाळी केल्यासारखी वाटली. कधी कधी बर्फावरून दुपारचे वेळी प्रकाश किरणाचे गुणित परावर्तन होऊन दशदिशांतून झगझगाट पसरून जाई व डोळयांस त्याचा त्रास होई, म्हणून काही प्रवासी दुपारच्या वेळी गॉगल्स वापरीत. सकाळी ८॥ च्या सुमारास आमची बस ज्योतिर्मठ अथवा जोशीमठ येथे येऊन पोहोचली. बस साधारण पंधरा एक मिनिटे थांबली. तेवढयात आम्ही खाली उतरून हात पाय मोकळे केले. चांगलीच थंडी वाजू लागली. सूर्याचे कोवळे किरण बर्फाच्छादित शिखरावर पडून आकाशात जणू रोषणाई झाली होती. त्यात नीलकंठ पर्वत तर फारच शोभायमान दिसत होता. ईशान्य बाजूस गंधमादन पर्वत आहे. येथून सृष्टिसौंदर्य जे दिसते ते केवळ अवर्णनीय आहे.

जोशीमठात दिवाळीपासून अक्षय्य तृतीयेपर्यंत बदरीनारायणाच्या भोग-मूर्तीची पूजा होते. या काळात बदरीनाथ बर्फाच्छादित असून बदरीपुरीचा मार्ग अतिशय बिकट व दुर्गम असतो. पंड्यांची वस्ती काही येथे व काही देवप्रयागला जाते. या काळात बदरीनारायणाची पूजा जोशीमठालाच होते. येथून दोन मैल उतारावर विष्णुप्रयाग आहे. येथे अलकनंदा व धोलीगंगा यांचा फारच रमणीय व चित्ताकर्षक असा संगम आहे.

जोशीमठात नृसिंहबदरीचे मंदिर आहे. या मंदिरात काळ्या शाळिग्रामाची मूर्ति आहे. जोशीमठापासून पुढे जाऊन नीतिघाट ओलांडल्यावर कैलासमानस सरोवराचा रस्ता लागतो. हा रस्ता जोशीमठापासून ६ मैल अंतरावर आहे. जोशीमठापासून ७ मैल अंतरावर तपोवन नावाचे एक सुंदर स्थान आहे. तेथून तीन मैलावर एक विष्णुमंदिर आहे. त्या मंदिराजवळ एक झाड आहे. त्या झाडाखाली बसून ध्यानस्थ बसले असता भगवान् विष्णूची निम्मी मूर्ति दिसू लागते, तेव्हां खरी बदरीनाथाच्या यात्रेची सुरुवात होते, या ठिकाणास भविष्यगंगा म्हणतात. जोशीमठाच्या आसपास अशी पवित्रस्थाने अनेक आहेत. जोशीमठाचा पर्वत उतरुन अलकनंदा ओलांडून पुन्हा ६००० फूट उंचीचा दुसरा पर्वत चढल्यावर एक शीख गुरुद्वार आहे. तेथें गुरुनानक यांनी ध्यानस्थ बसून ईश्वरी साक्षात्कार मिळविला होता. गुरुद्वाराच्या पुढच्या दरीत अत्यंत सुवासिक फुलांची झाडेच झाडे आहेत. त्यात ब्रह्मकमल नावाचे एक कमल आहे. त्याच्या सुवासिकपणाची फार ख्याती आहे.

जोशीमठ किंवा ज्योतिर्मठ येथे आद्यशंकराचार्यांनीं जे चार प्रसिद्ध मठ स्थापन केले व आपले शिष्यस्वामी ठेविले त्यांतील उत्तरापथ हिमालयामध्यें शंकराचार्यांची गादी आहे. हा मठ पहावयास पुष्कळ लोक जोशीमठाला थांबतात, व मुक्काम करुन आजूबाजूच्या पवित्र स्थानांचे दर्शनही घेतात.

आम्हाला तसा जोशीमठाला मुक्काम करता आला नाही त्यामुळे या मठांतील आचार्यांचे व इतर मंदिराचे दर्शन आम्हाला घडले नाही. जे काही यात्रेकरू येथे उतरले व ज्यांनी मुक्काम केला त्यांना बद्रीनाथाला जायला किंवा परत हृषीकेशला जायला वाहनच मिळेना. कारण सगळ्या गाड्या सरळ हृषीकेश ते बदरीनाथ अशा होत्या.

जोशीमठ सोडून आमची बस पुढे निघाली. साधारण अर्ध्या एक तासाने पांडुकेश्वर हे स्थान लागले. ह्या ठिकाणी काही मंदिरे आहेत. पांडवांचा पिता जो पंडुराजा हा जेथे आपल्या राण्या कुंती व माद्री यांच्यासह तपाचरण करीत होता, ते हे स्थान. पांडवांची जन्मभूमिही हीच. येथील पांडुकेश्वराची स्थापना पांडुराजानेच केलेली आहे, अशी आख्यायिका आहे. सुवासिक फुलांमुळे प्रसिद्ध असलेला असा गंधमादन पर्वत पलिकडेच आहे. पांडुकेश्वराच्या मंदिराला योगबद्रिभगवानाचे मंदिर म्हणतात. धो धो वाहाणाऱ्या अलकनंदेचे याठिकाणी सौम्य दर्शन होते. कारण

चारीबाजूंना बर्फाच्छादित पर्वत असून त्यातून तिला आपला मार्ग हळू हळू काढावा लागतो.

पुढचे ठिकाण हनुमान चट्टी हे होय. येथून बद्रीनाथ अवघ्या पाच मैलावर आहे. हनुमान चट्टीस हनुमंताचे देऊळ आहे. मारुती म्हातारा झालेला, आपली शेपटी पसरून बद्रीनाथाच्या वाटेवर लवंडला होता. भीम बद्रीनारायणाची यात्रा करण्याच्या हेतूने येथून जात होता. त्याने मारुतीला सांगितले वाटेतील तुझी शेपटी बाजूला काढून घे. मारुती म्हणाला, "मी आतां म्हातारा झालो आहे. माझ्या अंगांत आता पूर्वी इतके बळ नाहीं. तेव्हां तूच आपल्या हाताने माझी शेपटी उचलून घेऊन बाजूला काढून घे." "बरें आहे" म्हणून भीम शेपटी उचलावयाला लागला. पण काय? त्याला ती उचलताच येईना. किती शक्ति खर्च केली पण रतिभरसुद्धा त्याला ती शेपटी हालविता येईना. भीमाला आपल्या शक्तीचा गर्व झाला होता व त्या गर्वाचा परिहार झाला ते हे ठिकाण आहे. पुढे भीमाने वायुपुत्राला ओळखिले, मग दोघांची भेट झाली व दोघांनाही आनंद झाला.

हनुमानचट्टी सोडल्यावर साधारण ११ वाजतां आमची बस बद्रीनाथाला पोहोचली. सगळा काफिला थोडया फार वेळाने पोहोचला. यात्रेकरूंची उतरण्याची गर्दी सुरू झाली. आपापले सामान, काढू पाहू लागले. पंडयांची गडबड सुरू झाली. आम्ही उतरलो. उतरण्याचा हा बस स्टॅंड अगदी मैदानावरच आहे. आसमंतात मैदानच पसरलेले आहे, व तसे ते विस्तृतही आहे. चारी बाजूस बर्फाच्छादित पर्वत आहेत. उत्तरेकडून वहात येणारी अलकनंदा पश्चिमेकडून वहात येणारी ऋषिगंगा यांच्या संगमावर बद्रीनाथक्षेत्र व त्यामधील श्रीबद्रीनारायण मंदिर वसलेले आहे. श्रीबद्रीनाथाचे माहात्म्य त्यांच्या बद्दल प्रसिद्ध असलेल्या खालील स्तोत्रावरून कळून येईल.

**पवनमंदसुगंधशीतल, हेममंदिरशोभितम् ।**
**विकटगंगा बहत निर्मल, श्रीबद्रीनाथविश्वम्भरम् ॥**
**शेषसुमिरनकरत निशिदिन, धरत ध्यान महेश्वरम् ।**
**श्रीवेदब्रह्मा करत स्तुति, श्रीबद्रीनाथविश्वम्भरम् ॥**
**शक्ति-गौरि गणेश-शारद, नारदमुनिमुच्चारणम् ।**
**योगध्यान अपार लीला, श्रीबद्रीनाथविश्वम्भरम् ॥**
**इंद्र, चंद्र, कुबेर, दिनकर, धूपदीप प्रकाशितम् ।**
**सिद्धमुनिजन करत जय जय, श्रीबद्रीनाथविश्वम्भरम् ॥**
**यक्ष, किन्नर, करत कौतुक, ज्ञान, गन्धर्व, प्रकाशितम् ।**
**श्रीलक्ष्मी कमला चंबर डोलै, श्रीबद्रीनाथविश्वम्भरम् ॥**
**श्रीबद्रीनाथ की पढत स्तुति, होत पापविनाशनम् ।**
**कोटितीर्थ भयो पुण्य, प्राप्त यह फलदायकम् ॥**

बद्रीनाथला आम्हांस जो पंड्या प्रथम भेटला त्याचेकडे आम्ही उतरलो. उतरल्यावर प्रातर्विधि चहा वगैरे घाईघाईने उरकून श्रीबद्रीनाथाच्या मनोहर मंदिराचे व मूर्तीचे धावते दर्शन दुपारच्या बाराच्या आत घेतले, कारण दुपारच्या बारानंतर मंदिर बंद होते.

बद्रीनाथ गाव लहानसे तीनहजार वस्तीचे आहे. गावातील बहुतेक सर्व वस्ती पंड्यांची. गावात काही धर्मशाळा आहेत, परंतु बहुतेक यात्रेकरू पंड्यांच्या घरी उतरतात व पंडे त्यांची व्यवस्थाही चांगली ठेवतात. मंदिराच्या रस्त्यावर प्रसादाची, मेवामिठाईची, तसविरीची, पुस्तकांची दुकाने एकमेकांस लागून आहेत. दूध, पुरी, साग, लाडू, समोसा, बर्फी यांचीही दुकाने आहेत.

## बदरीनारायण :

चारी बाजूंना बर्फाच्छादित शिखरे आणि मध्ये मोकळ्या असलेल्या खोलगट पठारावर अलकनंदेच्या काठी बद्रीनाथ हे छोटेसे गाव वसले आहे. ऋषिगंगेचा प्रवाह डोंगरावरून बद्रीनाथला वळसा घालून जातो. प्रवाह जोराचा, पाणी थंडगार व भरपूर. अगदी गायमुखासारखे आहे. मंदिराची दगडी नक्षीदार इमारत सोडल्यास बाकीची सर्व घरे म्हणजे यात्रेकरूंसाठी बांधलेल्या धर्मशाळा आहेत. छोटीशी बाजारपेठ आहे. बसचा अड्डा आहे व पोस्ट ऑफिस आहे. मंदिराच्या जनरेटरपासून गावाला वीज मिळते. आजूबाजूच्या डोंगरावरून बर्फाच्या छोट्या मोठ्या नद्या ह्या पठारापर्यंत वहात येऊन स्थिरावलेल्या दिसतात. पश्चिमेकडील नीलकंठाचे संपूर्ण बर्फाच्छादित उत्तुंग शिखर (६५०० मी.) हिमालयाची भव्यता व विशालता भारावून टाकते. हे शिखर दिवसभर अभ्राच्छादित असते. फक्त सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान सूर्याचे कोवळे किरण थोडेफार दृष्टीस पडतात. अलकनंदेचे बर्फासारखे थंडगार पाणी अतिशय वेगाने खळाळत येऊन गावापासून वहात जाते. पण त्या थंडगार पाण्यापासून अवघ्या ६-८ मीटरांवर अत्यंत उष्ण पाण्याचे झरे तप्तकुंडात वहात येतात. निसर्गाचे अलौकिक सौंदर्य, छोटेसे खोलगट पठार व त्यामधून वाहणारी अलकनंदा नदी आणि भर हिमालयात ३३५० मीटर उंचीवरील सप्तकुंडांमध्ये उष्ण पाण्याची सोय! जणू निसर्गानेच हे नवीन तीर्थस्थान निर्माण केले!

जोशीमठ ते बदरीनाथ हा अवघा साडेत्रेपन्न किलोमीटरचा भाग आहे. मोटारी जाण्यासारख्या रस्त्याने जोडण्याचा विचार अनेक वर्षांपासून चालू होता. वाटेत अजस्र पत्थरांच्या प्रचंड पर्वतरांगा आहेत, हिमनद्या आहेत ; कोसळणारे बर्फाचे व डोंगराचे कडे आहेत. यामुळे व कडाक्याची थंडी, पाऊस, वादळ व शेवटी सहा महिने बर्फ यामुळे हा रस्ता बरीच वर्षे तयार होत नव्हता. शेवटी बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने तो तयार करण्याचे काम १९६२ साली हाती घेतले व १९६६ पर्यंत पूर्ण करून या वर्षापासून जोशीमठ व बदरीनाथ यामधील हल्लीचा रस्ता वहातुकीस खुला झाला.

बद्रीनाथाचे मंदिर मे महिन्यापासून आक्टोबर पर्यंत, अक्षय्य तृतीयेपासून दिवाळी पर्यंत साधारणतः सहा महिने उघडे असते. बाकीचे सहा महिने देऊळ बंद ठेवण्यात येते. एवढेच नव्हे तर गावात कोणाला रहाण्याची परवानगी नसते. या काळात गावातील घरे तीन चार मीटर बर्फाखाली गाडलेली असतात. हिवाळ्यानंतर देऊळ उघडले जाण्याचा कार्यक्रम अत्यंत विधिपूर्वक केला जातो. मंदिर उघडण्याची तारीख तेहरी-गढवालच्या राजज्योतिषांनी ठरवून अगोदर जाहीर केलेली असते. पूर्वी या मंदिराची मालकी व व्यवस्था टेहरी-गढवालच्या महाराजांकडे होती. प्रथम दरवाजे उघडण्याचा मान त्यांचा होता. रावळ पहिली पूजा करीत. रावळ म्हणजे देवस्थानचे मुख्य पुजारी. महाराजांच्या आज्ञेनुसार रावळ देवस्थानची सर्व व्यवस्था चालवीत असत, परंतु त्याकाळी देवस्थानच्या व्यवस्थेत बराच गोंधळ होऊ लागल्यामुळे १९३९ साली उत्तरप्रदेश सरकारने कायदा करून बदरीनाथ व केदारनाथ या दोन देवस्थानांसाठी विश्वस्तांची नेमणूक केली. त्यांच्याकडे या देवस्थानांच्या संपत्तीची व मालमत्तेची व्यवस्था सोपविली. आता संस्थाने व संस्थानाधिपती गेले आहेत तरीसुद्धा तेहरीगढवालच्या महाराजांचे या देवस्थानाबद्दलचे पूर्वापारचे अधिकार अबाधित आहेत. श्रीबदरीनारायणाच्या दर्शनाला भारताच्या सर्व भागांतून काश्मीर, पंजाब, तिबेट पासून ते तहत आसाम, ब्रह्मदेश, सयाम, रामेश्वर, केरळ व सीलोन येथपावेतोचे यात्रेकरू मोठ्या संख्येने दरवर्षी येतात. भाविकांच्या पूजेचे अग्रस्थान म्हणून या स्थानाला फार महत्त्व आहे.

आम्ही प्रथम श्रीबद्रीनारायणाचे धावते दर्शन घेतले. मंदिर लहानसेच आहे. मंदिराच्या महाद्वाराच्या आत शिरल्यावर प्रथम गरुडाची मूर्ती लागते. डाव्या बाजूस गेल्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या टेहरी गढवाल सैनिकांची नावे लिहिलेले एक ताम्रस्तंभाचे स्मारक आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात मूर्तीचे दर्शन होते. प्रकाश अपुरा वाटतो. त्यामुळे मूर्ती नीट पहाता येत नाहीत. बदरीनारायणाची मुख्य मूर्ती शाळिग्रामशिलेची पद्मासन घातलेली चतुर्भुज ध्यानमूर्ती आहे. उजव्या बाजूस जटाधारी नर व नारायण यांच्या मूर्ती आहेत. पुढयात देवी आणि भूदेवी यांच्या मूर्ती आहेत. त्यांच्यानंतर कुबेर व गरुड यांच्या पितळी मूर्ती आहेत. उद्धव व नारद यांच्याही मूर्ती आहेत. तशाच पादुकाही आहेत. मुख्य मंदिराच्या डाव्या बाजूस लक्ष्मीचे वेगळे मंदिर आहे. आणि तेथील पूजा अर्चा वगैरेची वेगळी व्यवस्था आहे. पंढरपुरसारखी येथेही महापूजा, पाद्यपूजा पुजाऱ्यांकरवी केली जाते. त्यांची तिकिटे असतात. महापूजेचा जास्तीत जास्त आकार हजार रुपयांचा आहे. अशी महापूजा चालू असताना इतरेजनांस दर्शन घेता येत नाही. महापूजा व पाद्यपूजा यांच्या वेळा साधारण ठरविलेल्या आहेत. एक अगदी लवकर व एक अगदी उशीरा. महापूजेचे किंवा पाद्यपूजेचे सामान अगदी जवळ मिळते. मंदिराच्या आवारातच व्यवस्थापकांचे, ट्रस्टींचे, कार्यालय आहे. तेथे पूजा, अभिषेक वगैरेंची तिकिटे मिळतात. सध्या यात्रेची गर्दी

असल्यामुळे या कचेरीतही गर्दी आढळली. मंदिराचे आवार लहान असल्यामुळे यात्रेकरूंच्या गर्दीने भरून गेले होते. दर्शनानंतर यात्रेकरूंना पुढे हटविण्यासाठी पुजारी व रखवालदार पंढरपुरच्या बडव्यांसारखे तोब्याचा उपयोग करीत. मंदिराच्या आवारात 'बद्रिविशाल की जय' 'गरुड भगवानकी जय' अशा घोषणा चालल्या होत्या. आम्हीही आमचा आवाज त्या आवाजात मिसळून दिला. मूर्तीच्या पुढे एक कठडा आहे. तेथूनच दर्शन घ्यावे लागते. बदरीनारायणाचा प्रसाद म्हणजे साखर-फुटाणे आणि चण्याची डाळ. देवाचा राजभोग म्हणजे ही डाळ व भात. हा भोग पैसे दिल्यावर मिळतो ; आता त्यात बर्फी, लाडू, मेसूर वगैरे पदार्थ आपण जसे पैसे द्यावे तसे मिळतात. असो.

× × ×

# शिर्डीवृत्त

## ( सप्टेंबर व आक्टोबर १९७१ )

दिनांक २९-९-१९७१ ते १-१०-१९७१ पर्यंत महासमाधि-उत्सव साजरा झाला. दिनांक ३-१०-१९७१ रोजी रात्री कोजागरी उत्सव व दि. २०-१०-१९७१ रोजी लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम संस्थानकडून यथोचितरीत्या साजरा करण्यात आला.

महासमाधि उत्सवाची हकीकत मागल्या अंकात आलेली आहे. महासमाधि-उत्सवासाठी आलेले बरेच भक्तजन कोजागरी उत्सवासाठी राहिले होते. कोजागरीच्या रात्री श्रीची अभिषेकपूजा व श्रींना सहस्र तुलशीदलांचे अर्पण संस्थानचे रिसीव्हर श्रीयुत पाठक यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचवेळी श्रीसाईलीलेचे एक माजी संपादक व संस्थानचे एक भूतपूर्व विश्वस्त डॉ. गव्हाणकर यांचे सुश्राव्य प्रवचन व त्यांच्या सोबत आलेल्या कलाकारांचे कार्यक्रम झाले. भक्तजनांना दहीपोह्यांचा प्रसाद वाटण्यात आला.

दिनांक १८।१०।१९७१ रोजी मंदिराच्या परिसरात सुंदर रोषणाई करण्यात आली होती. रिसीव्हर श्री. पाठक यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले. पाडव्याच्या दिवशी बर्फी चिवड्याचा प्रसाद वाटण्यात आला.

या कालात दर्शन घेऊन गेलेल्या लोकांत महाराष्ट्र राज्याचे मंत्री श्री. शंकरराव चव्हाण व श्री. निंबाळकर, गुजरात हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री. भगवती, मध्य-प्रदेशच्या हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. दीक्षित, महाराष्ट्र राज्याचे सचिव श्री. सुखठणकर व श्री. सुराडकर, अहमदाबादचे जिल्हान्यायाधीश श्री. देव, मध्य-प्रदेशातील मंडाले जिल्ह्याचे जिल्हाधिकारी काळे, सांगलीचे जिल्हाधिकारी श्री. सक्सेना, महाराष्ट्रातील शेतीचे डायरेक्टर श्री. जोशी, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर श्री. खंबाटा व मध्यप्रदेशच्या विधानपरिषदेचे सचिव श्री. शंकरराव रेड्डी हेही होते.

समाधि उत्सव व कोजागरीच्या वेळी अनेक कीर्तनकार, प्रवचनकार, गायक व कलाकार यांनी उत्तम कीर्तने, प्रवचने, गायनाचे व इतर करमणुकीचे कार्यक्रम श्रींच्या समाधीसमोर भक्तजनांसाठी सादर केले व श्रींना आपली आदरांजली वाहिली त्याबद्दल संस्थानचे चालक या सर्व मंडळीचे अत्यंत आभारी आहेत.

# श्रद्धांजली.

**श्री. नानासाहेब मोडक :**

दि. २८ आक्टोबर १९७१ रोजी मुंबई महापालिकेचे भूतपूर्व इंजिनिअर, मुंबई शहरात अस्तित्वात असलेल्या तानसा-वैतरणा पाणी पुरवठा योजनेचे जनक, सार्वजनिक आरोग्यासंबंधीच्या योजनाच्या बाबतीतील एक तज्ज्ञ सल्लागार, मुंबई-तील शिवाजी पार्क विभागाचे रचनाकार, शिवाजीपार्क व आसपासच्या भागातील अनेक सामाजिक, सार्वजनिक संस्थांचे कार्यकर्ते व आधार, वयाच्या ८३ व्या वर्षी निजधामास गेले व एक कर्तबगार जीवन विराम पावले.

इंजिनिअरिंगची पदवी १९१२ मध्ये मिळविल्यानंतर श्री. मोडक मुंबई सर-कारच्या नौकरीत शिरले. नंतर त्यावेळेच्या जी. आय्. पी. रेल्वेमध्ये एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर म्हणून गेले .नंतर एक शिष्यवृत्ती मिळवून परदेशी म्युनिसिपल व सॅनिटरी इंजिनिअरिंगचे विशेष शिक्षण घेऊन १९३० पासून त्यांनी आपणास मुंबई महा-पालिकेच्या सेवेस वाहून घेतले. या काळात त्यांनी आपल्या विशेष क्षेत्रात प्रावीण्य मिळवून जागतिक कीर्तीचे इंजिनिअर म्हणून ख्याती मिळविली. १९४५ मध्ये सर्व-साधारण सेवानिवृत्तीचे वय झाल्यानंतर त्यांच्या ज्ञानाचा लाभ आपणास आणखी काही वर्षे मिळावा म्हणून मुंबई महापालिकेने त्यांची खास इंजिनिअर म्हणून नेमणूक केली व १९५० मध्ये त्यांस आपल्या सेवेतून मुक्त केले. तथापि त्यानंतरही जवळ जवळ १९६९ पर्यंत ते अनेक संस्थांचे सल्लागार इंजिनिअर म्हणून काम करीत होते. या सर्व काळात त्यांनी अनेक संस्थांची सार्वजनिक व इतर कामे केली. जागतिक कीर्ती मिळाली असतांही ते मुंबईच्या सार्वजनिक जीवनात समरस झाले होते, आणि म्हणूनच त्यांना श्रद्धांजली वहाताना मुंबईचे महापौर डॉ. गुप्ते म्हणाले की ते 'मुंबईचे शिल्पकार' होते. मुंबईला पाणी पुरवण्याची तानसा-वैतरणा योजना हे त्यांचे चिरंतन स्मारक आहे. मुंबईच्या या भाग्यविधात्यास आम्ही आमच्यातर्फे व आमच्या वाचकांतर्फे आदरांजली वहात आहोत !

**डॉ. वी. वी. योध :**

दिनांक ३१-१०-१९७१ रोजी आपल्या वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी झालेल्या मुंबईतील डॉ. योध यांच्या निधनाने मुंबईतीलच नव्हे तर अखिल भारतीय वैद्यकीय व्यवसायाचे नुकसान झाले आहे, पण त्यापेक्षा आमजनतेचे अधिक नुकसान झाले आहे, कारण डॉ. योध यांनी आपल्या सर्व आयुष्यभर मानव-जातीचा शत्रू, गरीब जनतेचा काळ, पुरातन काळापासून चालत आलेला राजयक्ष्म्याचा रोग व त्याचे मानव जातीवर होत असलेले आक्रमण यास सातत्याने तोंड दिले होते, अनेक आर्तांना त्याच्यापासून रक्षण दिले होते. क्षयरोग्यांची बाबती

संख्या व त्यांना उपचारासाठी ठेवून घेणाऱ्या हॉस्पिटलांची अपूर्णता यामुळे या रोगाने पिडलेल्या बहुसंख्य रुग्णांची कुचंबणा होई, योग्य औषधोपचारांच्या अभावी त्यांस प्राणास मुकावे लागे. यासाठी डॉ. योध यांनी क्षयरोग्यांवर त्यांच्या घरीच औषधोपचार करण्याची पद्धती आखली व अंमलात आणली, आणि ही पद्धती फलदायी झालेली आहे. धनुर्वातावरही घरी औषधोपचार करण्याच्या योजनेचे ते अध्वर्यु होते.

क्षयनिवारणाच्या बाबतीत त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. मुंबई राज्य क्षयनिरोधक संस्थेचे ते संस्थेच्या स्थापनेपासून ऑनररी सेक्रेटरी होते व त्यांनी आपल्या अतोनात परिश्रमांनी या संस्थेस राष्ट्रात अग्रेसर स्थान मिळवून दिले व ते अद्यापही कायम आहे. १९४९ मध्ये त्यांनी भारतातील पहिले 'ऑर्गनाइज्ड होम ट्रीटमेंट क्लीनिक' सुरू केले. क्षयरोग्याप्रमाणेच अपंग बालकांबद्दलही त्यांना विशेष आस्था होती, हँडिकॅप्ड चिल्ड्रेन्स असोसिएशनचे संस्थेच्या स्थापनेपासून तो आपल्या निधनापर्यंत ते अध्यक्ष होते. आयुर्वेदिक मेडिकल फॅकल्टी उभारण्याच्या कामीही त्यांचा हातभार होता. १९६३-६४ पासून त्यांची प्रकृती ढासळू लागली होती. तरी देखील आपल्या अंतःसमयापर्यंत ते सतत कार्यनिमग्न असत. त्यांचे शिष्य व सहकारी, त्यांच्यासारखेच स्वतःस क्षयरोगनिवारण्याच्या कार्यास वाहून घेतलेले डॉ. एम्. डी. देशमुख आपल्या श्रद्धांजलीत म्हणतात :—

"योध साहेब, तुम्ही आम्हा सर्वांना पोरके करून गेलात, पण तुम्ही घालून दिलेले धडे आम्ही कधीही विसरणार नाही. तुमचे कार्य आम्ही नेहमी चालू ठेवू. कृपादृष्टी ठेवा."

डॉ. योध गेले--नव्हे नव्हे, डॉ. देशमुख व त्यांच्या अन्य शिष्यांच्या सहकाऱ्यांच्या स्वरूपात ते अद्याप आपणात वावरत आहेत. ते व त्यांची परंपरा चिरंतन होवो हीच आमची श्रीसाईचरणी प्रार्थना !

## विचारप्रवर्तक मराठी साहित्यिक :

कोरेगाव (जि. सातारा) येथे गेल्या बऱ्याच वर्षांपासून निवृत्तीचे जीवन घालवित असलेले, १९०९ ते १९६२ पर्यंतच्या काळात लिहिलेल्या आपल्या विचारप्रवर्तक ललित व अन्य ग्रंथांनी मराठी वाचकांच्या दोन तीन पिढ्यांना यथायोग्य मार्गदर्शन केलेले जुन्या पिढीतले प्रख्यात साहित्यिक नारायण हरी आपटे दिनांक १४-११-१९७१ रोजी वयाच्या त्र्यायशिव्या वर्षी परमेश्वरचरणी विलीन झाले. ईश्वर त्यांस आवश्यक ती शांती देवो, कारण आयुष्यभर त्यांना प्राप्त परिस्थितीवर मात करण्यासाठी झगडावे लागले होते, आपल्या ग्रंथांतून प्रदर्शित केलेले विचार व तत्वज्ञान अनेक इष्टानिष्ट अनुभवांच्या खाईतून जाऊन मिळवावे लागले होते.

आजच्या तरुण पिढीच्या वाचनात श्री. आपटे यांचे बरेचसे ग्रंथ आले नसतील. परंतु जे काही ग्रंथ आमच्या मुलामुलींनी वाचले असतील ते त्यांस आकर्षक व आगळ्या स्वरूपाचे असल्याचे निश्चित आढळून आले असेल, त्यांतील आत्मानुभवाने विकसित झालेल्या लेखकाच्या तत्वज्ञानाने त्यांच्या मनाची पकड घेतली असेल.

श्री. आपटे यांचा जन्म आडगावी एका लहानशा खेड्यात झाला होता. लहानपणीच ते मातापित्यांच्या छत्रास मुकले होते. दारिद्र्यामुळे त्यांना आपला विद्याभ्यास पुरा करता आला नाही. परंतु आपल्या मायभूमीचे ऋण फेडण्यासाठी यत्न करण्याची ऊर्मी त्यांच्या संवेदनाशील मनात निर्माण झाली. तिच्यातून पुढे भ्रमन्ती आली. या भ्रमन्तीतच त्यांना अनेक तऱ्हेचे अनुभव आले आणि या अनुभवांच्यायोगे त्यांचे जीवनाचे आत्मप्रत्ययी तत्वज्ञान उदयास आले. या तत्वज्ञानाचा आविष्कार करण्यासाठी, त्याचा फायदा अन्य जनांना आपणासारखे हालअपेष्टात न जाता मिळावा म्हणून त्यांच्यातील लेखनप्रतिभा त्यांच्या वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी जागी झाली. ती पुढे सतत पंचावन्न वर्षे कार्य करीत राहिली. आपटे यांनी आपली पहिली कादंबरी 'अजिंक्यतारा' १९०९ मध्ये प्रसिद्ध केली व शेवटची कादंबरी 'जवानांचा जीवनधर्म' १९६२ मध्ये प्रसिद्ध केली. दरम्यानच्या काळात ऐतिहासिक, सामाजिक, अद्‌भुतरम्य विषयांवर, विद्यार्थी जीवनावर, प्रापंचिक पार्श्वभूमीवर कादंबऱ्या, कथा व लेख लिहून आपले विचार लोकांस समजतील अशा स्वरूपात लोकांच्या समोर मांडले. पंच्याहत्तरपेक्षां अधिक पुस्तके त्यांनी लिहिली व प्रसिद्ध केली, आणि त्या सर्वच पुस्तकांचे त्या त्या काळातील वाचकांनी स्वागत केले.

त्यांच्या सर्व लेखनातून अंतःकरणातील तळमळीचा, कर्तव्यबुद्धीचा, त्यांनी स्वीकारलेल्या जीवन मार्गाचा ठसा उमटलेला आहे. आपल्या समाजातील दुर्गुण व दोष नाहीसे करुन त्यांच्या जागी सद्‌गुण आले पाहिजेत व त्यासाठी लेखकाने लेखणी राबविली पाहिजे असे त्यांचे व्रत होते आणि त्यांनी ते अखेरपर्यंत पाळले. प्रामुख्याने प्रबोधनासाठी त्यांनी आपले लिखाण केले, परंतु त्याबरोबरच त्याची रंजकताही यत्किंचित कमी होऊ दिली नाही.

त्यांच्या वैयक्तिक जीवनाचे सार, स्वावलंबन आणि ध्येयवाद. कोरेगावसारख्या खेड्यात राहून स्वतःचे लेखन स्वतःच मुद्रित व प्रकाशित करण्याचा धाडसी प्रयोग त्यांनी केला. त्यांच्या या अभिजात वाङ्‌मयीन गुणांमुळे ग्रंथ स्वतः विकत घेऊन वाचण्याची प्रवृत्ती सर्वसाधारण लोकात कमी असलेल्या काळातही तो यशस्वी झाला.

आता आपटे यांच्या सारखे प्रतिभासंपन्न, दुर्दम्य आशावादी व ध्येयवादी लेखक कमी कमी होत आहेत. त्यामुळेच आजच्या तरुण पिढीस आम्ही विनंती करीत आहोत की त्यांनी कै. श्री. नारायण हरींचे सर्वच ग्रंथ एकवार वाचावेत. आजही त्यांस ते रोचक वाटतील व अनेक दृष्टींनी उद्बोधक होतील यात संशय नाही.

## कॅप्टन लिमये :

नानासाहेब आपटे यांच्या पाठोपाठच चार दिवसांनी दिनांक १८-११-१९७१ रोजी मराठीचे दुसरे नामवंत साहित्यिक कॅप्टन गो. गं. लिमये यांनी मराठी वाचकांचा निरोप घ्यावा ही गोष्ट मराठी वाचकांस जाणवणारी आहे. परंतु ना. ह. आपटे यांच्याप्रमाणेच कॅप्टन लिमये हे कृतार्थ जीवन जगले व त्यांच्याप्रमाणे मराठी वाचकांची सतत साठ वर्षं सेवा करुन वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी आपणा सर्वांचा निरोप घेतला आहे. सुदैवाची गोष्ट ही की त्यांनी आपला हा निरोप घेण्यापूर्वी त्यांचे आधुनिक मराठी लघुकथेच्या अग्रदूतत्वाचे स्थान नागपूरचे तरुण वाङमयसमीक्षक श्री. राम कोलारकर यांच्या प्रयत्नांनी आपणा सर्वांस मान्य झाले होते. तसेच श्री. राम कोलारकर यांनी संपादित केलेला त्यांच्या निवडक कथांचा संग्रह याच वर्षी त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध झाला होता. सुडौल ललित लेखनशैली व चमत्कृतिपूर्ण रचना यामुळे त्यांच्या कथा खुमासदार व आकर्षक आहेत. परंतु कॅप्टन लिमये यांना कथालेखकापेक्षा विनोदी लेखक म्हणून सर्वसाधारण मराठी वाचक ओळखत होता. हल्लीचे प्रख्यात विनोदी लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे कॅप्टन लिमये 'मराठी साहित्यातील विनोदाचे खलिफा' होते. कवि कुसुमाग्रज यांनी त्यांचे 'साहित्यसृष्टीतील भीष्माचार्य' असे वर्णन केले होते, तेही सार्थ आहे.

अशा प्रकारचा महान साहित्यिक चिरविश्रांतीसाठी निजधामास गेला आहे. परमेश्वर त्यांस आवश्यक ती विश्रांती देवो व त्यांनी ठेवलेल्या साहित्यसंपत्तीतून त्यांच्या सारखे लघुकथा व विनोदी लेखन करण्याची स्फूर्ती नवोदित लेखकांस मिळो हीच आमची त्यास प्रार्थना !

# जीवन जगण्याची कला

**The Art of Living**

## या पुस्तिकेचा मराठी अनुवाद

आधुनिक विचारवंतांत व वेदांत तत्त्वज्ञानाच्या प्रसारकांत, स्वामी चिन्मयानंद यांचे स्थान फार वरचे आहे. त्यांनी केलेल्या गीतायज्ञांमुळे गीतेतील तत्त्वज्ञानाची ओळख भारतातच नव्हे तर पाश्चिमात्य राष्ट्रांतही अनेकजणांना झालेली आहे. वेदान्ताचे ते गाढे अभ्यासी असून वेदांताचे गूढ तत्त्वज्ञान सुलभ कसे व्हावे, त्याची कशी मांडणी केली असता ते सहजरीतीने समजू शकेल, याचा त्यांनी खोलवर विचार केला आहे. त्यांनी स्थापिलेल्या सांदीपनी विद्यालयातील श्री. पार्थसारथी यांनी स्वामीजींच्या Kindle Life, Secret of Action, Introduction to Kenopanishad and Ishavasyopanishad वगैरे ग्रंथ व आकाशवाणीवरून प्रसृत झालेली त्यांची भाषणे, यांच्या साहाय्याने The Art & Living नावाची एक सुंदर पुस्तिका तयार केली आहे. त्या पुस्तिकेचा उद्देश हा आहे की वेदांताचा अभ्यास करू इच्छिणारांना आवश्यक ते प्रास्ताविक ज्ञान प्राप्त व्हावे. पुस्तिका इंग्रजीत असल्यामुळे इंग्रजी न जाणणाऱ्या मराठी भाषिकांना तिचा फायदा मिळू शकत नाही. ही उणीव दूर व्हावी म्हणून पुस्तिकेचा मराठीत स्वैर अनुवाद करण्यात येऊन तो सेंट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट यांच्या परवानगीने श्रीसाईलीलेत या अंकापासून हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध करण्यात येत आहे. अनुवादात ओजस्वीपणा व प्रवाहीपणा न आढळून आल्यास वा त्यात वेदांतातील एखादा सिद्धांत व्यवस्थितपणे मांडला गेला नसल्याचे वा विपर्यस्त रीतीने मांडला गेला असल्याचे आढळून आल्यास वाचकांनी तो अनुवादकाचा दोष समजावा. कारण मूळ ग्रंथ इतका ओजस्वी व प्रवाही आहे व स्वामीजींच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली तयार झालेला असल्यामुळे तो इतका बिनचूक आहे की हे सर्व गुण मूळ ग्रंथात आहेत त्या प्रमाणात अनुवादात आणणे अत्यंत कठीण व कौशल्याचे काम आहे. अनुवादकास ते काही वेळा योग्य प्रकारे करता आले नसल्याचा संभव आहे. अनुवादकाचाही हेतू हाच आहे की अनुवादवाचनाने वाचकास वेदांताच्या अभ्यासाची प्रेरणा व्हावी, व त्याचा वेदांतातील प्रवेश सुलभ व्हावा.

—संपादक

# जीवन जगण्याची कला

## प्रस्तावना

या पुस्तिकेचे दोन विभाग असून त्यातून वेदांत तत्त्वज्ञानासंबंधीची प्रास्ताविक माहिती व त्या तत्त्वज्ञानाची मूलभूत बैठक सांगितली आहे.

ही पुस्तिका तयार करण्याचा मुख्य उद्देश हा आहे की वेदांताच्या अभ्यासासाठी अत्यावश्यक असलेले मूलभूत ज्ञान एके ठिकाणी योग्य क्रमाने मिळावे. यातील कल्पना स्वामी चिन्मयानंद यांच्या किंडल लाइफ, सीक्रेट ऑफ अॅक्शन, दी इंट्रोडक्टरी पोर्शन्स ऑफ ईशावास्योपनिषद अँड केनोपनिषद वगैरे ग्रंथांतून व आकाशवाणीवरून प्रसृत झालेल्या त्यांच्या भाषणांतून घेतल्या आहेत; योग्य जीवनाच्या सर्वसाधारण सिद्धांतांपासून गूढ तत्त्वज्ञानाच्या खोलीपर्यंत विचाराचे संक्रमण हळू हळू कसे होत गेले हे विद्यार्थ्याला समजावे म्हणून तर्कशास्त्रदृष्ट्या सुसंगत अशा क्रमाने या कल्पना काळजीपूर्वक एकत्र केल्या आहेत व मांडल्या आहेत.

कल्पनांची वरील प्रकाराने मांडणी करताना कल्पना मनावर बिंबून माणसास त्या चांगल्या प्रकारे समजाव्यात म्हणून पुष्कळ कल्पनांची द्विरुक्ती झालेली आहे, परंतु कोणत्याही शास्त्रीय विषयाचे ज्ञान मिळविताना एखादा सिद्धांत विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबून त्यास तो पूर्ण आत्मसात् होईपर्यंत त्यावरील अनेक उदाहरणे व प्रमेय त्याचे-कडून वरचेवर सोडवून घेणे आवश्यक असल्याचे आढळून येते, तसाच हा प्रकार आहे.

पहिल्या विभागात पंचवीस लेख आहेत. ते फ्री प्रेस जर्नलची रविवारची आवृत्ती म्हणजे भारत ज्योती यातून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहेत. दुसऱ्या विभागात वेदांत तत्त्वज्ञानासंबंधीचे मूलभूत सिद्धांत व गोष्टी यांचा सारांश दिला आहे. हे ज्ञानकण एकत्र करून विद्यार्थी वेदांताचा अभ्यास सुरू करावयास समर्थ होतो. अशा पूर्वतयारीनंतर या पुस्तिकेच्या शेवटी दिलेल्या, स्वामीजींनी तयार केलेल्या अभ्यासाच्या योजनेनुसार त्याने पुढे जावे. साप्ताहिक असंख्य चिन्मय मिशन अभ्यास वर्गातून ही योजना पद्धतशीर व संघटित रीतीने अवलंबिली जात आहे. या अभ्यास-क्रमात सहभागी व्हावयाची वाचकांची इच्छा असल्यास त्यांनी प्रस्तुत लेखकाशी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

श्री. ए. टी. तरकस यांनी या बाबतीत अमूल्य सूचना व टीका करून या पुस्तिकेच्या प्रसिद्धीच्या कामी एकनिष्ठ सेवाभावाने जे साहाय्य दिले त्याबद्दल कृतज्ञतेचा एक शब्द उच्चारणे अवश्य आहे.

सांदीपनी साधनालय, —ए. पार्थसारथी
साकी विहार रोड, पवई, मुंबई-७०.

# जीवन जगण्याची कला-विभाग पहिला.
## स्वातंत्र्य आणि स्वैराचार
## [ १ ]

साईबाबा-पे. नं. ४७ वरुन

मानवाने या जगाचे नंदनवन केले आहे. त्याला भिवविणाऱ्या व सतत त्याच्या पाठीस लागलेल्या नैसर्गिक शक्तींवर त्याने तावा मिळविला आहे. त्यांना आपल्या कामास जुंपले आहे. ओसाड पडित जमीन प्रचुर अन्नधान्योत्पादनक्षम केली आहे. आदिमानवाच्या रानटी अवस्थेपासून सुसंस्कृत बुद्धिजीवी समाजाच्या स्थिती-पर्यंत त्याने प्रगती केली आहे. स्वर्गातील जवळजवळ सर्व सुखे व सोयी त्याने प्राप्त करून घेतल्या आहेत. आणि अनियंत्रितपणे तो त्यांचा उपभोग घेत आहे. तथापि पर्वतप्राय समृद्धि व संपत्ति यांच्यांत लोळत असूनही आजचा मानव चिंता, काळजी व असमाधानाचे जीवन जगत आहे.

मानवतेच्या कल्याणासाठी ज्यांनी आपले आयुष्य अर्पिले आहे असे तत्वबेत्ते या दुःखमय विरोधाची कारणे काय आहेत याचा शोध घेत आहेत. त्यांच्या संशोधनात त्यांना आढळून आले आहे की वैषयिक सुखाचा अनियंत्रित व अतिरेकी उपभोग मानवाच्या व्यक्तित्वाचा क्षय करीत आहे. उदाहरणार्थ,:- मिष्टान्नाची पहिली चव वर्णनीय असते, पण वरचेवर ते खाल्ल्याने त्याची गोडी कमी कमी होत जाते आणि शेवटी ते औषधासारखे कडू लागते, एवढेच नव्हे तर खाणाऱ्याच्या आरोग्यास बाधक होते. आणि म्हणून आपल्या पुरातन ऋषिमुनींनी मानव व जगातील इतर वस्तु यांच्या परस्पर संबंधाच्या बाबतीत काही आत्मसंयमनाचे व शिस्तीचे मूलभूत नियम घालून दिले आहेत.

परंतु मानवाला स्वभावतः निर्भेळ, अनियंत्रित स्वातंत्र्य हवे असते व त्यावर कोणतीही बंधने घातली तरी त्यास त्यांचा तिटकारा येतो. आपण अमूक करावे, अमुक करू नये असे कोणी त्यास सांगितले तर त्यास ते आवडत नाही. बैल जसा तांबड्या चिंधीला बिचकतो तसा तो मनाई व आदेश यांनी भडकतो, आणि म्हणून आध्यात्मिक आत्मसंयमनाच्या कोणत्याही कल्पनेविरुद्ध तो बंड करून उठतो.

बिचारी आत्मसंयमन व शिस्त यांवर स्वातंत्र्य उभे असते, हे तो यत्किंचितही ओळखत नाही. उदाहरणार्थः- रस्त्यावरील वहातुकीचे दिवे शासनाने आपल्या स्वातं-त्र्यावर घातलेली बंधनेच आहेत, परंतु या बंधनांमुळेच वाहतुकीच्या स्वातंत्र्यास अर्थ प्राप्त होतो, आणि स्वैर वाहातुकीचे दुष्परिणाम टाळले जातात.

आधुनिक मानवास धर्माबद्दल तिटकारा वाटतो, त्याचे मूळ कारण हे आहे की त्याला स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांच्यामधील भेद समजू शकत नाही. आपल्या

धार्मिक ग्रंथांतून अशा गोष्टी सांगितल्या आहेत की ज्यांच्यायोगे आपल्या बुद्धीस आपण स्वेच्छेने आपणास घालून घ्यावयाच्या बंधनांची आवश्यकता व उपयुक्तता पटते व त्यांची आत्मपर शास्त्रीय चिकित्सा आपण करू शकतो. यंत्राचा चांगला उपयोग कसा करावा हे समजण्यासाठी त्याच्याबरोबरच्या मार्गदर्शकाचा जसा उपयोग होतो, तसा या गोष्टींचा आपणांस उपयोग होतो. जगातील सजीव व निर्जीव वस्तूंच्या सहवासात येणाऱ्या अत्यंत गुंतागुंतीच्या अशा या मानवी यंत्राचा उपयोग केव्हा कोठे करावा, ते कोठे कसे लावावे, हे समजणे आवश्यक असते व धार्मिक ग्रंथांच्या मार्गदर्शनाने ते समजते. धार्मिक ग्रंथांतील आदेश पाळून मानवी यंत्रापासून अधिकात अधिक सुख मिळविणे वा हे आदेश झिडकारून दुःख वा कष्ट यांना आवाहन करणे या बाबतीत मानवास स्वातंत्र्य आहे. त्यामुळे आपले जीवन सुखमय व यशस्वी करावयाचे वा ते दुःखपूर्ण, कष्टाचे करावयाचे हे त्याच्याच हाती असते.

आध्यात्मिक व धार्मिक ग्रंथांतून जीवन चांगले कसे जगावे याचे शास्त्र विस्तृतपणे सांगितले आहे, आणि प्रज्ञावस्थेत आपणांस त्यापासून परमेश्वराच्या साक्षात्कारात परिणत होणाऱ्या आत्मविकासाचे पूर्ण तंत्र कळते. आपला विकास करून घेऊन त्यापासून सुसंवादी राष्ट्र निर्माण करण्याच्या आपल्या प्रयत्नांत आपण या अनुभवसिद्ध यशस्वी पद्धतीचा अवलंब कां करू नये ?

## योग्य संपर्काची कला

## [ २ ]

स्वैराचार हे खरे स्वातंत्र्य नाही आणि त्याची परिणती एकाच गोष्टीत होते, ती म्हणजे नाश. निसर्गाचे नियम व दुसऱ्यांच्या हक्कांची जाणीव यांनी जेव्हां स्वातंत्र्य नियमित केले जाते, तेव्हा आपण शांततेच्या व उत्कर्षाच्या विस्तृत क्षेत्रात विकसित होतो. आपल्या देशाची राज्यघटना स्वातंत्र्य ओळखते व प्रस्थापित करते, परंतु त्याबरोबरच तिच्यात आपणास करावयास आवडणाऱ्या अनेक गोष्टी न करण्याबद्दलचे खूप नियम व बंधने आहेत व त्यामुळेच स्वातंत्र्यास खरा अर्थ प्राप्त होतो.

तसेच धार्मिक ग्रंथांतून जीवनासंबंधी विवक्षित नियम घालून दिलेले आहेत, आपल्या सभोवतालच्या वस्तूंशी येणारा आपला संबंध कोणत्या मार्गाने कसा यावा हे त्यांत सांगितलेले आहे व त्यामुळे आपले जीवन अधिक सुसंवादी होते. ज्यावेळी या नियमांचा बुद्धिपूर्वक आदर केला जातो, त्यावेळी जगातील इतर वस्तूंशी येणारा आपला संबंध योग्यप्रकारे येतो व त्यामुळेच आपणांस निरामय प्रगतिशील जीवन प्राप्त होते. रोजच्या व्यवहारात वीजेशी येणाऱ्या आपल्या संपर्काने ही गोष्ट विशद होते. घरात पाहिजे तितकी वीज पाहिजे तेव्हा वापरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आपणांस असते; परंतु त्यासाठी विजेशी येणारा आपला संबंध योग्य प्रकारे यावा लागतो व विजेचे नियम आपणांस काटेकोरपणे पाळावे लागतात. नाहीतर विजेच्या शक्तीमुळे आपला निर्घृणपणे नाश होतो.

सर्वसाधारण तक्रार अशी आहे की जग हे दुष्ट गोष्टींनी भरलेले आहे, अपूर्ण आहे, त्यात धक्के आहेत, निराशा आहेत आणि त्यामुळे जगात शांतता व समाधान कशी मिळवावीत हे समजत नाही. परंतु आपणांस निराश व्हावयाचे कारण नाही. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की बोथट हत्यारास धार लावण्यासाठी खडबडीत दगड लागतो. धारेच्या दगडावर हत्यार कसे परजावे हे माहीत झाले की धारेच्या दगडाच्या खडबडीतपणामुळेच हत्यारास धार लागते. तसेच आयुष्यात देखील ज्यावेळी जगातील इतर गोष्टींशी योग्य संपर्क कसा प्रस्थापित करावा हे आपणांस कळते, त्यावेळीच आपण आपले स्वतःचे व्यक्तित्व शुद्ध व विकसित करू शकतो. म्हणून जगातील वाईट गोष्टींचे अस्तित्व ही आपली समस्या नाही, आपल्या जीवनगतीस रोध करू शकणारी शक्ती नाही. मानवाची खरी अडचण ही आहे की त्याच्यापुढे उभ्या असलेल्या समस्यांना कुशलतेने तोंड कसे द्यावयाचे हे त्यास समजलेले नसते.

ही साधी गोष्ट न समजल्यामुळे जीवनासंबंधीचा योग्य दृष्टिकोन नाहीसा होतो, आणि मग आपण जग वाईट, हल्लीचा काळ वाईट, अशा तक्रारी सतत करीत बसतो. दुधाने अर्धाच भरलेला पेला पहा. आपल्या भावना व बुद्धी यांस अनुसरून निरनिराळ्या लोकांकडून तो निरनिराळ्या प्रकारांनी पाहिला जातो. एकजण रिकाम्या भागाकडे पहातो व तो रिकामा असल्याबद्दल तक्रार करतो. दुसरा भरलेला खालचा भाग पहातो व त्यामधील दुधाचा मोकळेपणाने आस्वाद घेतो.

ज्यावेळी आपण सर्वसाधारण माणसांच्या दृष्टिकोनांची चिकित्सा करतो, त्यावेळी अविवेकामुळे सदैव रडणाऱ्या माणसांच्या दीर्घ रांगांच्या रांगा लागलेल्या आपणांस आढळून येतात. चाकाच्या खुर्चीवर बसलेला लंगडा माणूस तक्रार करीत असतो, चालणाऱ्या माणसासारखे आपणांस पाय नाहीत, चालणारा माणूस स्कूटरवरून जाणाऱ्या माणसाचा हेवा करतो व स्कूटरवरील माणसाचे लक्ष मोटारीत बसलेल्या माणसाकडे असते. आणि मोटारीतील माणूस आपणास प्राप्तीकर भरावा लागत असल्याबद्दल दुःख करीत असतो. खरोखर माणसाची बरीच दुःखे अशीच असतात. परंतु त्याबद्दल निराश व्हावयाचे कारण नाही; कारण अशी दुःखे नष्ट करावयाचा उपाय साधा व स्पष्ट आहे.

आपणापेक्षा कमी नशिबवान असलेली माणसे व ती मागत असलेल्या गोष्टी यांजकडे आपण लक्ष देऊ या व त्या लक्षात घेऊन आपण आपल्या मनात परमेश्वराबद्दल कृतज्ञताबुद्धी निर्माण करू या! आपणांस न मिळालेल्या गोष्टींची अभिलाषा न बाळगल्याने आपल्या मानसिक शक्तीची बचत होते, त्यामुळेच आपणास मनःशांति प्राप्त होते व कोणत्या वेळी कसे वागावे हे समजते.

# मानवाची आनुवंशिकता

## [ ३ ]

स्वातंत्र्य हा मनुष्यपणाचा खरा अर्क आहे व जगातील सुखोपभोग देणाऱ्या गोष्टींची गुलामगिरी ज्याने टाकून दिली आहे तोच खरा स्वतंत्र असतो. बाकीची माणसे उन्हाळ्यातील वावटळीबरोबर उडणाऱ्या पिसांसारखी असतात. जगातील निरनिराळ्या समस्यांनी व आवाहनांनी ती इकडून तिकडे फेकली जात असतात.

इंद्रियगोचर गोष्टी सुखाची भ्रामक चकाकी आपणांस दाखवितात. आपणासमोरील सर्वभक्षक इंद्रियगोचर गोष्टींच्या आवाहनास तोंड देणे हाच मानवाचा अग्रहक्क आहे, उत्कर्षबिंदू आहे. मानवी जीवनरूपी समुद्रात पूर्णत्वास पोहोचलेला माणूस दीपगृहाचे कार्य करतो, सुंदर असतो, आणि खवळलेल्या लाटांच्या मारापासून मुक्त असतो. स्वतंत्रतेच्या जीवनाची ही कला न ओळखल्यामुळे जगातील अशाश्वत गोष्टींनी भरलेल्या खवळलेल्या दर्यावरील कोणाचेही लक्ष नसलेल्या नावेसारखी आपली स्थिती होते. या खवळलेल्या सागरातून आपले जीवनतारू पूर्णत्व, शांती आणि सलोख्याचे बंदरास पोहोचविण्यासाठी खवळलेल्या दर्यात सापडलेल्या आपल्या तारूच्या बाबतीत कुशल दर्यावर्दी जे तंत्र वापरतो ते आपणास वापरावयास हवे.

स्वभावतःच माणसात दैवी गुण असतात, दैवी संपत्ति प्रत्येकाच्या हृदयात असते, परंतु आयुष्याच्या आवाहनांस तोंड देण्यासाठी आपण कोणत्या दिशेला वळावे हे आपणांस समजत नाही. म्हणून ज्याप्रमाणे दर्यावर्दी होकायंत्राच्या अचूकतेवर विश्वास ठेवतो आणि आपली नाव पुढे हाकारतो, त्याचप्रमाणे आपणांस पूर्णत्व व परम शांती प्राप्त होईपर्यंत आपण आपल्या आयुष्याची नाव धर्मग्रंथावर विश्वास व भक्ती ठेवून हाकारली पाहिजे.

आपल्या सभोवतालच्या वातावरणावर स्वामित्व मिळविल्यामुळे त्याने हादरून न जाणारा व शांत असलेला माणूस पुष्कळवेळा चुकीने दगडी पुतळाच मानला जातो की ज्याच्यावर त्यास हार घातल्याने काही परिणाम होत नाही, वा त्याच्या डोक्यावर कावळा बसला तरी त्यात काही बिघाड होत नाही. जगातील गोष्टींबद्दलच्या वरवर दिसणाऱ्या त्याच्या अनास्थेबद्दल व निरिच्छतेबद्दल अशा माणसावर टीका होते व तो कामातून गेला आहे असे मानले जाते. परंतु त्याचे कारण हे असते की त्याच्या परमपदप्राप्तीबद्दल सर्वसाधारण माणूस अज्ञानी असतो. अशा माणसास भावना नाहीत असे म्हणणे बरोबर नसते. भावना त्यास निश्चित असतात, पण तो त्यांना आपणावर वर्चस्व गाजवू देत नाही. दुसऱ्याबद्दलच्या सहानुभूतीची भावना निश्चित चांगली असते, परंतु भावनांचा उद्रेक माणसाच्या आयुष्यातील समतोल

नाहीसा करतो, व त्याच्या आध्यात्मिक व आधिभौतिक प्रगतीस अडथळा करीत असतो. भावनांनी माणसास शोभा येते, पण त्यांचा उद्रेक त्याच्या व्यक्तित्वावर एक बेडौल डाग लावतो.

या राष्ट्रातील पूर्वसूरी अशा प्रकारच्या व्यक्ती होत्या व त्या आयुष्यातील वादळात हिमालयासारख्या अचल रहात. विकार व भावना यांनी दुःखपीडित मानवजातीबद्दल त्यांची हृदये हेलावली जात असत, परंतु त्यांची मस्तके ढगांच्या वरील उच्च ध्येयाच्या शाश्वत प्रदेशात उन्नत असत.

आयुष्यातील अनिश्चित वावटळीमुळे मनुष्य हेलावला जाण्याची शक्यता असते. परंतु आयुष्याचे ध्येय शोधून आपले व्यक्तित्व किरकोळ भावनांपासून दूर करून स्वीकारलेल्या ध्येयाच्या परमोच्चतेपर्यंत नेऊन तो त्यातून मार्ग काढू शकतो. आयुष्यातील यशाची गुरुकिल्ली हृदयात निर्माण होणाऱ्या वादळांच्या वर आपले मस्तक ठेवणे हीच आहे. आयुष्यातील यशस्वी माणूस भावनांनी निर्माण केलेल्या लाटांनी चलित होत नाही, आपली विचारशक्ती व आपला निर्णय डळमळू देत नाही.

योग्य मानले गेलेले अनुभवजन्य ध्येय आपण स्वीकारू या व सदैव त्या ध्येयास संपूर्णतया अनुसरून रहाण्यासाठी आवश्यक अशा धैर्याचा पाठपुरावा सतत करू या ! ध्येयास पूर्णत्वाने वाहून घेऊन आपल्या मतांबद्दल बुद्धीने प्रामाणिक राहिल्याने माणसाच्या व्यक्तित्वास गंभीर सौंदर्य प्राप्त होते. व्यक्तिगत जीवनाचे यश व सौंदर्य राष्ट्राच्या उपयुक्ततेचे व कीर्तीचे मंदिर बांधण्यास मदत करते.

## जीवनाचे सौख्य

## [ ४ ]

जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसावर दोन मुख्य भावनांचा पगडा असतो व त्याच्या सर्व कृतींत त्या दिसून येतात. त्या म्हणजे दुःखाचा तिटकारा व सुखाची आकांक्षा. सोईस्कर वा पुष्टिकर नसलेली गोष्ट वा परिस्थिती तो टाळतो वा टाकून देतो. आपल्याला सोईस्कर वा पुष्टिकर असलेल्या गोष्टींच्या पाठीस तो लागतो. परिणामत: जगातल्या गोष्टी व परिस्थिती बदलत असल्यामुळे माणूसही सुखाच्या न संपणाऱ्या शिकारीत सदैव मग्न असतो. सुख मिळविण्यासाठी उपयोगात आणलेल्या पद्धती व साधने निरनिराळ्या माणसांच्या बाबतीत निरनिराळी असू शकतात, परंतु सर्वांचे साधारण उद्दिष्ट एकच असते. त्यामुळे सुख कोठे असते याची चिकित्सा करणे व त्याचा शोध घेणे उपयुक्त आहे.

आज जगात एक दृढ समज आहे तो हा की इंद्रियांनी अनुभवता येणाऱ्या सुखाची स्थाने त्या त्या वस्तूंत असतात. या समजास अनुसरूनच अधिकाधिक संपत्ति

संपादन करणे, ती संभाळणे व तिचा उपभोग घेणे यांत आपण नेहमी गुंतलेलो असतो. परंतु थोडया विचारांनी आपणास हे कळून येते की संपत्तीने संपादन व उपभोग माणसाने सुख किती आहे हे मोजण्याचे परिमाण नाही. लाखोपती आपल्या प्रासाद-तुल्य वाडयात बसून कष्टी असतो, तर फाटके तुटके कपडे असलेला मजूर वा शेतकरी आपल्या गरीबीच्या स्थितीत देखील भरपूर सुखात निमग्न असल्याचे आपण बरेच-वेळा पहातो.

शिवाय सुख हे जर सुख निर्माण करणाऱ्या वस्तूत असल्याचे आपण मानले तर प्रत्येक वस्तूपासून सर्वांस ठराविक प्रमाणातच सुख मिळावयास पाहिजे. पण ते तसे कधीच नसते. उदाहरणार्थः— सिगारेट ओढल्याने एखाद्यास आनंद व समाधान वाटते, दुसऱ्यास तिच्यापासून होणाऱ्या त्रासाने वेड लागण्याची वेळ येते. मग एकास होणारे समाधान व दुसऱ्यास होणारा त्रास ह्याचे कारण काय आहे याचा विचार करता आपण मूळ प्रश्नाकडे येतो——तो म्हणजे सुख म्हणजे आहे तरी काय ?

काळजीपूर्वक विचार करता आपणांस आढळून येते की माणसाचे सुख हा पूर्णत्वाने स्वानुभूतीचा प्रकार आहे, कारण प्रत्येक माणसाच्या बाबतीत त्याच्या मनाची स्थिती व त्यास अनुभवास येणारे सुख वा दुःख यांचा वेगळा आणि स्पष्ट असा संबंध असल्याचे आपणास दिसून येते. ज्यावेळी तो शांत असतो त्यावेळी सुख वाटते. म्हणजे सुखाची मोजदाद माणसाच्या मनाच्या स्थिरास्थिरतेवर होत असते.

सृष्टिनिर्मितीचा कळस जो मानव त्यास सभोवतालच्या वस्तूंवर असहाय्यपणे अवलंबून न राहता आपल्या मनास शांत राखण्याचे एकमेव सामर्थ्य असते . परंतु हे सामर्थ्य सुप्त असते, आणि त्याची त्यास जाणीव नसल्यामुळे तो मूर्खपणाने जगातील चकाकी असणाऱ्या भ्रामक सुख देणाऱ्या वस्तूंच्या पाठीस लागतो व त्यांचा शोध घेतो. खरोखर, त्या गोष्टी केव्हाही शाश्वत समाधान देऊ शकत नाहीत.

आपणातील हे सुप्त सामर्थ्य जागृत व वर्धिष्णु करण्यास आपले महान धार्मिक ग्रंथ सहाय्य करतात. तात्पुरत्या नश्वर इंद्रियजन्य सुखाच्यासाठी इंद्रियगोचर वस्तूंच्या पाठीस लागणे मानवास आवश्यक नाही. सोईस्कर गोष्टी व परिस्थिती यांच्यावर अवलंबून नसणाऱ्या अधिक शाश्वत व पूर्ण सुखाच्या शोधात मानवाने मग्न व्हावे. असा शाश्वत सुखाच्या शोधात मग्न झालेला माणूस आयुष्याच्या खवळलेल्या सागरात इतस्ततः फेकल्या जाणाऱ्या आपल्या बांधवांस मार्गदर्शक होतो. पूर्णत्वाचा प्रकाश देणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे तो उभा असतो.

## कर्माची अटळता

## [ ५ ]

कर्म म्हणजेच आयुष्य. कोणत्याही सजीव प्राण्यास जगात रहावयाचे असल्यास कर्म करणे भाग असते. परंतु केलेल्या वा करावयाच्या कर्माचे प्रकार व्यक्तिव्यक्तिगत

भिन्न असतात. या पवित्र भूमीतील प्राचीन महर्षींनी संपूर्ण संशोधन व शास्त्रीय चिकित्सेनंतर कर्माच्या सर्व प्रकारांचे वर्गीकरण ठोकळ स्वरूपात तीन भागांत केले आहे. या वर्गीकरणानुसार आपण माणसांचे तीन वर्ग करतो. पहिला वर्ग श्रमिक जनांचा म्हणजे व्यवसायी लोकांचा. दुसरा वर्ग कार्यकर्त्यांचा म्हणजे सेवेकऱ्यांचा. तिसरा वर्ग म्हणजे सिद्ध जनांचा म्हणजे योग्यांचा. हे वर्गीकरण कामाच्या स्वरूपावर अवलंबून नसते तर आयुष्यातील ज्या प्रकारच्या ध्येयपूर्तीसाठी कर्माची प्रेरणा होऊन ते ज्या प्रकाराने केले जाते त्यावर अवलंबून असते.

ज्या माणसाचे आयुष्य ध्येयहीन असते व जो स्वतःच्या वा स्वतःच्या कुटुंबाच्या फायद्यासाठी मजूरी वा काही फायदा वा मोबदला मिळविण्यासाठी स्वार्थपरायणतेने काम करतो तो श्रमिक वा व्यवसायी माणूस असतो, त्याच्या कामात श्रम केलेले व घाम गाळलेला असतो, परंतु त्याचा हेतू स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात अधिक सुखसोयी मिळविणे हा असतो. म्हणून समाजात मुख्य न्यायाधीश पगारासाठी वा फायद्यासाठी काम करीत असेल तर त्याचा समावेश श्रमिक वा व्यवसायी माणसाच्या व्याख्येत होईल.

मनात आयुष्याबद्दल अधिक उदात्त कल्पना असलेला आयुष्यासंबंधी स्फूर्तिदायक ध्येय वा उद्देश असलेला माणूसही श्रमिक वा व्यवसायी माणूस काम करीत असलेल्या क्षेत्रात काम करीत असतो, परंतु तो ते काम कमी स्वार्थबुद्धीने करतो. असा माणूस कार्यकर्ता वा सेवेकरी म्हटला जातो. अशा तऱ्हेने आपणांत राजकीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक कार्यकर्ते असतात. हे कार्यकर्ते आपल्या अधिक फायद्याकडे लक्ष ठेवीत नाहीत, तर त्यांच्यासमोर ध्येय असते व आपले ते ध्येय प्राप्त करण्यासाठी व समाजाच्या कल्याणासाठी सतत झटत असतात. मोठे उत्स्फूर्त राजकारणी पुरुष, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्यकर्ते या वर्गात मोडतात.

अत्यंत उच्च व उदात्त प्रकारचे लोक जगात सिद्ध पुरुष वा योगी म्हटले जातात. हे लोक पैशासाठी वा यशासाठी काम करीत नाहीत. ते इंद्रियजन्य सुखाच्या पाठीस लागलेले नसतात वा जगाच्या सुधारणेची आकांक्षा बाळगत नाहीत. ते निष्ठेने आपली आवश्यक कर्तव्ये पार पाडीत असतात, व त्यातूनच ते शांती, कर्तव्य केल्याचे समाधान मिळवीत असतात. काहीही हक्कांची मागणी न करता आपणांकडून पराकाष्ठेने केले गेलेल्या आपल्या कर्तव्यातच त्यांची तृप्ती असते. समाज आपल्या कार्याची प्रशंसा करील वा निर्भत्सना करील इकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष असते. इतिहासात अशा अनेक महायोग्यांना त्यांच्या कार्याची बक्षिसी देहदंडात मिळाल्याचे आपण पहातो. येशू ख्रिस्तास क्रूसावर चढविण्यात आले, साक्रेटिसाला विषप्राशन करावे लागले व गांधीजींवर गोळ्या झाडल्या गेल्या ही याची उत्तम उदाहरणे आहेत. काही लोक असेही आढळतात की त्यांच्या पूर्ण व पुण्यप्रद कर्तृत्वाबद्दल त्यांची त्यांच्या पिढीकडून पूजा केली जाते, प्रशंसा केली जाते.

आयुष्यातील सर्व प्रकारच्या कार्यांत हे तीन प्रकार आढळून येतात. आपण काय करतो याला महत्त्व नसते, तर प्रयत्नांचे मोठेपण, ते कलाप्रकाराने केले जातात यावर अवलंबून असते. आयुष्यातील ध्येय व एखाद्या मोठ्या उद्दिष्टाचे स्वप्नरंजन यामुळे माणसास दैनंदिन कार्याची स्फूर्ति होते व आपल्या कार्यात गोडी व उत्साह वाटतो. अशा तऱ्हेने आयुष्यात ध्येय निर्माण केले तर आपणातील श्रमिक कार्यकर्ता वा सेवेकरी होतो त्यानंतर सिद्धावस्था प्राप्त होईपर्यंत कार्य करण्यातच कार्याची पूर्ती असल्याचे त्यास वाटेपर्यंत तो निस्स्वार्थपणे कार्य करीत रहातो.

आपल्या राष्ट्राची आजची ही गरज आहे. आज आपण औद्योगिक युगात आहोत, व त्यापासून आपणांस परतता येत नाही. तरुण पिढी वेगवान उद्याच्या निर्मितीच्या युगात तयार होत आहे. यावेळी श्रमिकांच्या कार्याला तत्त्वज्ञानाची बैठक देऊनच पवित्रपणा आणता येईल. अशा बैठकीशिवाय आपणांपैकी प्रत्येकाच्या कर्तबगारीचे मंथन करून निर्मितीच्या कार्यासाठी तिचा उपयोग आपणांस करता येत नाही. त्यामुळे श्रमिक कार्यास तत्त्वज्ञानाची बैठक जितक्या लवकर आपण देऊ तितके चांगले. त्यायोगे राष्ट्रास आपल्या कार्यासाठी एकनिष्ठ व कार्यक्षम सामर्थ्य प्राप्त होईल.

## यशाची गुरुकिल्ली

## [ ६ ]

कार्याचे मूल्य त्याच्या व्यापावरून केले जात नाही, ते त्याच्या गुणवत्तेवर व पद्धतीवर अवलंबून असते. ज्या ध्येयांनी माणूस कामास प्रवृत्त होतो व ज्यांच्यापासून त्यास मार्गदर्शन होते त्या ध्येयांनी माणसाच्या कामाची गुणवत्ता वाढत असते. माणसाचे ध्येय जितके अधिक उदात्त व अधिक उच्च असते तितके तितके त्याच्या कार्याचे सौंदर्य व त्याची क्षमता वाढत असते. असल्या ध्येयामुळे जगातील सामर्थ्यवान महापुरुषांनी अतिमानवी गोष्टी प्राप्त करून घेतल्या आहेत व या जगात आश्चर्यकारक मोठे व उदात्त कार्य केलेले आहे आणि त्यांच्या पश्चात येणाऱ्या पिढ्या त्या कार्याची फळे चाखीत आहेत.

जगाच्या आजच्या परिस्थितीत माणूस आपल्या कार्यास निश्चित ध्येयाच्या प्रवाहातून नेत नाही. तो स्वार्थी वृत्तीने काम करतो व अधिक उच्च व उदात्त कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले ध्येय वा दृष्टि त्याच्याजवळ नसते. त्यास त्याचे अंगीकृत कार्य –मग ते सचिवालयातील कारकुनीचे असो वा एखाद्या संस्थेच्या चालकाचे असो-कंटाळवाणे होते. कार्यालयास पोहोंचताच तो थकतो आणि अशा अवस्थेतच तो काम करतो. काम संपल्यानंतर घरी परत येण्यास त्याच्याजवळ काहीच उत्साह राहिलेला नसतो. अशा स्थितीत त्याचे कार्य निरुपयोगी होते व तो समाजाला भारभूत होतो.

प्राचीन महर्षींनी या थकव्याचा शोध घेतला आहे, त्याबद्दल विचार केला आहे, त्याची कारणे हुडकली आहेत आणि तो कसा घालवावा व माणसाने आपल्या कार्याने सौंदर्य व क्षमता वाढवून जगात सौख्य आणि आनंद कसे आणावेत हे सांगितलेले आहे. आपल्या कार्याच्या फलाबद्दलच्या अमर्याद आंकांक्षा आणि संपूर्ण अज्ञानामुळे इंद्रियजन्य सुखाच्या इच्छा त्यायोगे निर्माण होत असलेल्या मानसिक शीण व दौर्बल्य यामुळे आपणास आपल्या कार्यात थकवा येतो असे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. या विपर्यस्त इच्छांनी व काळजांनी आपले सामर्थ्य नष्ट होते व आपली अवस्था कुजलेल्या प्रेतासारखी होते.

म्हणून आपणापुढे निश्चित उदात्त ध्येय वा आदर्श ठेवणे, त्याच्या सिद्धीसाठी सतत एकाग्रतेने कार्यरत रहाणे व त्यायोगे मानसिक सामर्थ्याचा होत असलेला ऱ्हास थांबविणे ही आपल्या यशाची गुरुकिल्ली आहे. निःस्वार्थ बुद्धीने व समर्पित वृत्तीने केलेल्या अशा कार्यांमुळे आपणास सतत स्फूर्ती मिळते, मनःशांति प्राप्त होते, आयुष्यात गोडी व आनंद वाटतो व आपण कार्यक्षम व यशस्वी होतो.

धर्म हा माणसास उच्चतम ध्येय पुरवीत असतो. परंतु आजच्या स्पर्धेच्या, स्वार्थाच्या व स्वयंकेंद्रित वृत्तीच्या युगात माणसास आपल्या कार्यपद्धतीत क्रांतिकारक बदल करता येत नाही. कार्याचे परिणाम मग ते व्यावहारिक असोत वा आध्यात्मिक असोत, निःस्वार्थी एकाग्रतेनेच मोजता येतात. आणि म्हणून आपणांस आपल्या महर्षींनी सांगितले आहे की आपण व्यक्तिगत कार्य न करता समाजकल्याण, राष्ट्र-विकास वा अशाच चांगल्या कारणासाठी करण्यात येणारे कार्य करावे व त्याच्या सिद्धीसाठी आपले सर्व प्रयत्न असावेत.

अशा तऱ्हेने धर्म आपणांत हळूहळू अधिक व्यापक दृष्टी निर्माण करण्यास व अधिक उच्च कार्य करण्यासाठी व त्या कार्यापासून पुढील कार्याची स्फूर्ती मिळण्या-साठी सहाय्य करीत असतो. इंद्रियांचे समाधान व व्यावहारिक गोष्टींच्या संपादना-पासून मिळणाऱ्या नश्वर सुख यांपेक्षा निःस्वार्थीपणाने केलेल्या चांगल्या कार्यापासून मिळणारे समाधान अधिक चागले असते.

आयुष्यातील यश आपल्या हृदयात असते, बाहेरील जगात नसते आणि धर्म त्याजकडे कसे जावे हे सांगत असतो.

## पावित्र्य आणि धर्मातीतता

## [ ७ ]

जेव्हा माणसाचा जगातील वस्तूशी संबंध येतो तेव्हा त्यास सुखाचा वा दुःखाचा अनुभव येतो. माणूस आणि जग यांच्या युतीत अनुभवास येणाऱ्या सुखदुःखांच्या मालिकेस आयुष्य असे म्हणतात.

आर्थिक, राजकीय व पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रांत संशोधन केलेल्या आधिभौतिक शास्त्रज्ञांची धारणा होती की जगाचे वातावरण सुधारून माणसाचे जीवन अधिक चांगले व सुखी करता येईल. ही भावना व मानवाची सेवा करावयाची मनापासूनची इच्छा यामुळे या शास्त्रज्ञांनी भरपूर परिश्रम केले व वैषयिक सोयी देणाऱ्या चैनीच्या गोष्टींनी भरलेले आजचे आश्चर्यकारक जग निर्माण करण्यात यश मिळविले. तथापि आपणांस हे आढळून येईल की सबंध जगात ताण व तणाव खूपच प्रमाणांत आहेत व मानव अंधारातच चाचपडत आहे.

जीवनातील या विरोधाची कारणे शोधण्याचा सर्वांगीण व परिपूर्ण असा प्रयत्न आपल्या देशातील महान धर्मवेत्त्यांनी पूर्वी केलेला होता. त्यांना आढळून आले की माणसाच्या अंतर्मनाचा संबध सुखोपभोगाच्या बाह्य गोष्टींच्या विपुलतेशी वा दुर्भिक्षाशी अजिबात नसतो. आणि जेव्हा माणसास वाटणारी बाह्योपाधींची ओढ अंतर्मनाच्या ओढीपेक्षा अधिक प्रबळ होते तेव्हा समाजात विषमता निर्माण होते. आणि ही विषमता आजच्या मानवी समस्यांचे आदिकारण आहे, जिच्याबद्दल बरेच बोलले जाते अशा जागतिक आणीबाणीच्या परिस्थितीचे अचूक निदान आहे.

तत्त्वज्ञान व धर्म माणसाच्या व्यक्तित्वाचे पुनर्वसन करतात, व त्यास समतोल प्राप्त करून देतात आणि त्याच्यायोगे तो आपले आत्मिक जीवन अधिक परिपूर्ण, अधिक विशाल, अधिक विश्वात्मक आणि थोडक्यात अधिक मानवतेचे करतो, आयुष्यातील घडामोडींचा उपभोग घेण्याचे सामर्थ्य माणसास केवळ वैयक्तित पुनर्वसन व अंतर्मनाचे नियमत यांनी प्राप्त होते. माणसाच्या व्यक्तित्वाचे पुनर्विकसन झालेले असल्याशिवाय निवळ जगातील बाह्य गोष्टींच्या सौंदर्याने व पुनर्रचनेने माणूस ज्याच्या शोधात असतो ते सुख व शांती त्यास प्राप्त होत नाही, तसा प्रयत्न करणे म्हणजे खूप अजीर्णामुळे अन्नाची ओकारी येत असलेल्या माणसासमोर भरपूर अन्नाचे ताट ठेवण्याप्रमाणे चमत्कारिक व निरर्थक असते. माणसास कडाडून भूक लागलेली असते तेव्हाच त्यास जेवणाच्या खऱ्या सुखाचा अनुभव येतो. त्याच-प्रमाणें माणसाच्या अंतर्गत व्यक्तित्वाच्या विकसनामुळे जीवनाची भूक निर्माण होते आणि केवळ त्यामुळेच त्यास आजच्या शास्त्रीय जगातील मानवाने मिळविलेल्या महान गोष्टींचा उपभोग घेता येतो.

आधिभौतिक विकास व उत्कर्ष जीवनमान उंचावतात तर अंतर्यामीचे पुन-र्वसन मानवी जीविताचे मान सुधारते. जीवनमान व मानव जीविताचे मान या दोन्ही गोष्टी सारख्याच वाढवाव्या लागतात, समतोल ठेवाव्या लागतात. कारण त्यामुळेच माणसास आपल्या आयुष्यातील आवाहनांस आनंदाने आपला तोल जाऊ न देता सुखाने व सहजतेने तोंड देता येते. जीवनमान होडीच्या शिडासारखे असते. ते उंच असेल तर होडी उलटू नये म्हणून तिचे बूड खोल व रुंद असावे लागते व या खोलीवर मानवी जीविताचे मान अवलंबून असते.

माणसांच्या समाजात आधिभौतिक शोधांना ओळखण्यासाठी एक निश्चित व वेगळे स्थान असते. अंतर्यामीच्या आत्मिक विकासापासून दुरावलेली चमत्कारिक असलेली आधिभौतिकता व धर्मातीतता माणसाच्या आड येत असते. त्याचप्रमाणे युरोपात मध्ययुगात झाले तसे आधिभौतिक विकासापासून दूर राहिलेला चमत्कारिक धर्म मानवतेस तमोयुगात नेतो. आणि म्हणून पवित्रता व धर्मातीतता यांचा योग्य मिलाफ हेच जगातील आजच्या समस्यांचे स्पष्ट उत्तर आहे. शांतता व सुख यांचा सुवास त्याच माणसास पसरविता येतो की जो निरामय असतो व आधिभौतिक समृद्धीने भरलेल्या जगात योग्य धर्माच्या शिस्तीत रहात असतो.

## द्विविधमार्ग

[८]

ज्या माणसाजवळ निरामय अंतर्गत विकसित व्यक्तित्व नसते व ज्यास आयुष्य गतिशीलतेने पूर्णपणे उपभोगण्याची उत्कट आकांक्षा नसते त्या माणसास केवळ आधिभौतिक उत्कर्ष सुखाप्रत नेऊ शकत नाही. जीवन योग्य प्रकारे जगण्याची आकांक्षा माणसात आपल्या धर्मशास्त्र ग्रंथांतून सांगितलेल्या शिस्तीने व बौद्धिक आत्मसंयमनाने निर्माण होते.

आधुनिक मानव शिस्त व आत्मसंयमन यांचा तिरस्कार करतो कारण तो त्यांस आपल्या स्वाभाविक स्वातंत्र्यास बंधने घालणाऱ्या शृंखला समजतो आणि म्हणून आध्यात्मिक कार्याच्या कल्पनेपासून तो दूर पळतो. अशी ही वृत्ती ज्यांना धर्माचे आदेश, आज्ञा पाळण्याचे व योग्यवेळी त्या बुद्धीने समजून घेऊन त्यांची निरामय जीवन जगण्याच्या संहितेतील व्यावहारिक उपयुक्तता जाणून घेण्याचे शिक्षण नसते त्यांच्यांत निर्माण होते. बुद्धीस न समजलेल्या सुखोपभोगांच्या नकाराने मनातील भावना दाबल्या जातात व त्यामुळे वैफल्याची व एकांततेची वृत्ती निर्माण होते. आणि ही गोष्ट धर्माबद्दल सार्वत्रिक दिसणाऱ्या तिटकाऱ्यास जबाबदार आहे.

वरील युक्तिवादाचा अवलंब करून धार्मिक आदेश झिटकारणे हे कुत्र्यास पिसाळलेला आहे म्हणून ठार मारण्यासारखे आहे, कारण धर्म माणसास आपल्या व्यक्तित्वाच्या विकसनास, आयुष्य अधिक चांगल्या रीतीने घालविण्यास व अधिक चांगल्या रीतीने उपभोगण्यास मदत करीत असतो. माणसाच्या अंतर्गत व्यक्तित्वाच्या विकसनाच्या बाबतीतले नियम बुद्धीने योग्य प्रकारे समजून घेतल्याने व जाणल्याने माणसास अधिक उच्च ध्येयांची स्फूर्ति होते व आयुष्याकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन अधिक विशाल होतो. अंतर्गत विकसनाच्या बाबतीत माणूस जसजसा प्रगती करतो तसतशा त्याच्यात असणाऱ्या नीच प्रवृत्ती आपोआप गळून पडतात, त्यास आलेल्या उच्च समजामुळे तो नीच मूल्यांचा आपोआप त्याग करतो व त्याची परिणती शास्त्रग्रंथांनी सांगितलेल्या तऱ्हेच्या विलयनात (दबावाने गळून पडण्याच्या विरुद्ध असलेल्या) होते. धर्मग्रंथांचे मार्गदर्शन व आपली सदसत् जाणण्याची बुद्धी बाजूस सारून माणूस नेहमी जीवनातील नीच व अनुदात्त गोष्टींनी आकर्षला जात असल्याचे दिसते. हे आश्चर्यजनक आहे की माणूस जाणून बुजून

आपल्या अंतिम कल्याणास विरोधी असलेला मार्ग निवडतो. महान ऋषींनी या प्रश्नाचा विचार केला व त्या बाबतीत ते निश्चित व स्पष्ट निर्णयांप्रत आले.

आयुष्य घालविण्याचे दोन स्पष्ट व वेगवेगळे मार्ग आहेत. एक सुखाचा म्हणजे प्रेय मार्ग. दुसरा कल्याणकारी म्हणजे श्रेय मार्ग. आपल्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यास या पैकी कोणत्या मार्गाने आपण जावे हे आपणास ठरवावे लागते. प्रेय मार्ग गोड सुखकारक व आकर्षक असतो. माणसास आपल्या बाजूस ओढतो. तर योग्य अशा धर्माच्या आज्ञा व निर्बंध यांवर आधारलेल्या श्रेय मार्गास माणसाचे मन विरोध करते. सुखकारी प्रेयमार्ग माणसास तावडतोब सुख देतो, पण अखेरीस निराशा व दुःख यांच्या बुडबुड्यात तो परिवर्तित होतो व कुजतो.

याच्या विरुद्ध श्रेय मार्गाचा सुरुवातीस कंटाळा येतो पण नंतर तो अधिक सुखाप्रत व प्राप्तीच्या संतोषाप्रत नेतो.

धर्माची तुलना पोलिसाशी करता येते. तो मानवजातीला श्रेय मार्ग दाखवितो, पण अनिश्चयी मन तावडतोब सुख मिळविण्याच्या लालसेने दुसरा मार्ग निवडते. अशा तऱ्हेने माणूस धर्मग्रंथांत सांगितलेल्या अधिक चांगल्या व गंभीर सुखापासून वंचित होतो. सर्व विवेकी व निश्चयी माणसे योग्य मार्ग निवडतात व इतर माणसांसही चिरंतन शांतता व सुख यांजप्रत नेतात.

## जगण्याची कला

## [९]

जमात वा राष्ट्र सदस्य व्यक्तीचे बनलेले असते त्याचे सामर्थ्य व समाधान त्याच्याजवळील आधिभौतिक संपत्ती व त्यास वेष्टणारी परिस्थिती यांवरच केवळ अवलंबून नसते, तर ते संबंधित व्यक्तीच्या संघटनेवर व त्यांच्या संयोगाच्या पद्धतीवर प्रामुख्याने विसंबून असते. एकाद्या इमारतीची मजबुती जशी तिच्या बांधकामात वापरलेल्या विटा ज्या पदार्थाच्या बनलेल्या असतात व ज्या प्रकाराने तयार केल्या गेल्या असतात त्यावर अवलंबून असते तसेच हेही असते. निधर्मीय-त्वाच्या योजना व आजच्या युगात मिळविलेली शास्त्रीय संपदा निश्चितपणे भव्य व स्वीकारार्ह आहेत पण ज्यावेळी त्यांचा प्रत्यक्ष व्यवहार जीवनात उपयोग केला जातो त्यावेळी त्या एखाद्या कबरीप्रमाणे आपली शांती व आपआपले सौख्य यांस वेष्टित आहेत असे दिसते. आजच्या ह्या आधिभौतिक संस्कृतीचा हा दुर्दैवी पण सत्य असा अनुभव आहे. शास्त्र आणि धर्म , निधर्मी वृत्ती व पवित्रता यांचा संयोग हाच यांपासूनच्या सुटकेचा मार्ग असतो.

अर्थकारण, राजकारण, पदार्थविज्ञानशास्त्र यांच्या क्षेत्रांत मनःपूर्वक काम करीत असलेल्या शास्त्रज्ञांस आतापर्यंत जिच्यामुळे मानवास आयुष्यात खरी शांती

व खरे सौख्य यांचा उपभोग घेता येईल अशी मानवी जीवनाची एखादी योजना निर्माण करण्यात यश मिळालेले नाही. मानवाचा इतिहास हा शांततेच्या नावा-खाली वरचेवर झालेल्या लढाया व क्रांत्या यांच्या शोकांती घटनांची मालिका आहे. आपण आज एकाच प्रकारची शांती जाणतो, ती शांती म्हणजे दोन युद्धांच्या मध्यंतरच्या काळात थकव्याने गलितगात्रांमुळे व नीतिधर्मापासूनच्या युतीमुळे आपण घेत असलेला विसावा.

आपल्या जन्मसिद्ध हक्कानुसार सुखाने व समाधानाने लोक राहू शकतील अशी शांततामय शासनपद्धती शोधून काढण्यात कोणतेही युद्ध वा क्रांती यशस्वी झालेली नाही.

